संस्थापक के. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

बुकिंग सुरु होते ₹1100* पासून | अतिरिक्त कॅश डिस्काउंट ₹1000* | कमी डाउनपेमेंट सुरु होते @ ₹1999* पासून | ₹5000* पर्यंत कॅशबॅक

डिलिव्हरीवर आकर्षक कॅश डिस्काउंट आणि एक्स्चेंज बोनस#

1800 266 0018

HF Deluxe
ON ROAD PRICE ₹83,749*

रजि नं. १९४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, गुरुवार दि. २६.०९.२०२४ | अंक नं. १७६ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६९ वे | ANR/022/2018-2020

सलग तिसऱ्या दिवशीही जिल्ह्यात 'मुसळधार'

मोठे, लघु, मध्यम जल प्रकल्प भरले, सर्वच नद्यांमध्ये पाण्याचा मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरु

नगर – नगर जिल्ह्यात सर्वच भागात परतीच्या पावसाने चांगलाच बरसत आहे. जिल्ह्यात बुधवारी (दि.२५) सलग तिसऱ्या दिवशीही अनेक भागात मुसळधार पावसाने हजेरी लावली. यावर्षी पावसाने सरासरी ओलांडली असून त्यामुळे जिल्ह्यातील प्रमुख धरणांबरोबरच लघु आणि मध्यम प्रकल्प गावोगावी असलेले गाव तलाव, पाझर तलाव पूर्ण क्षमतेने भरले आहेत. जिल्ह्यातून वाहणाऱ्या सर्वच प्रमुख नद्यांमध्ये पाण्याचा मोठ्या प्रमाणावर विसर्ग सुरु असून त्यामुळे नद्या दुथडी भरून वाहत आहेत.

बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाल्याने हवामान विभागाकडून नगरसह अनेक जिल्ह्यांना 'अलर्ट' जारी करण्यात आला आहे. नगर जिल्ह्यात गेल्या तीन दिवसांपासून जोरदार पाऊस सुरु आहे. अनेक ठिकाणी या पावसामुळे नुकसान झाले आहे. सलग तीन दिवस झालेल्या मुसळधार पावसाने गावागावातील नद्यांना पूर आला असून अनेक गावांचा संपर्क त्यामुळे तुटला आहे.

जिल्ह्यात बुधवारी (दि.२५) दिवसभरात नगर तालुक्यात ८.५ मिमी, पारनेर – १६.९ मिमी, श्रीगोंदा – १४ मिमी, कर्जत –१३.४ मिमी, जामखेड – १२.९ मिमी, शेवगाव – ७ मिमी, पाथर्डी – २२.८ मिमी, नेवासा – २०.८ मिमी, राहुरी – ३२ मिमी, संगमनेर – २९.२ मिमी, अकोले – २५.२ मिमी, कोपरगाव – ७४.३ मिमी, श्रीरामपूर – ३५.८ मिमी, राहाता – ६५.४ मिमी असा जिल्ह्यात एकूण सरासरी २४.८ मिमी पाऊस झाला आहे.

मुळा व जायकवाडीतून विसर्ग वाढविला

सलग ३ दिवसांपासून सुरु असलेल्या मुसळधार पावसाने मुळा धरणात मोठ्या प्रमाणावर पाण्याची आवक सुरु असून धरण बुधवारी (दि.२५) सायंकाळी ७ वाजता पूर्ण क्षमतेने १०० टक्के भरले आहे. मुळा धरणाचा एकुण साठा २६ हजार द.ल.घ. फु. झालेला असल्यामुळे व धरणात आवक चालू असल्यामुळे नदीमधील विसर्ग १५०० क्यूसेकने वाढवून एकूण विसर्ग ५५०० क्यूसेक्स एवढा केला आहे. पाणलोट क्षेत्रात पाऊस होत असल्यामुळे विसर्गात आवश्यकतेनुसार वाढ केली जाणार असल्याचे पाटबंधारे विभागाने सांगितले.

तर दुसरीकडे पैठण येथील जायकवाडी धरणाच्या (नाथसागर जलाशय) विसर्गात गुरुवारी (दि.२६) सकाळी १०.३० च्या सुमारास वाढ करण्यात आली आहे. धरणाचे गेट क्र. १० ते २७ असे एकुण १८ गेटस २ फुट उंचीवरुन २.५ फुट उंचीवर उघडून एकूण ९४३२ क्युसेक्स विसर्ग वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे जायकवाडी धरणातून गोदावरी नदीपात्रात सांडव्याद्वारे एकूण १८ गेटमधुन ४७१६० क्युसेक विसर्ग सुरु करण्यात आला आहे. धरणातील पाण्याची आवक बघून विसर्ग कमी अथवा जास्त करण्यात येईल. तरी नदी काठच्या लोकांनी सतर्क रहावे व नदी पात्रात प्रवेश करू नये. तसेच कुठलीही जीवित व वित्तहानी होणार नाही, याबाबत खबरदारी घ्यावी, असे आवाहन पाटबंधारे विभागाने केले आहे.

जिल्ह्यातील नद्यांमधून सुरु असलेला विसर्ग

नगर जिल्ह्यातून वाहणाऱ्या प्रमुख मोठ्या नद्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग सुरु आहे. गुरुवारी (दि.२६) दुपारी १२ वाजता भिमा नदी – दौंड पूल विसर्ग (मॅन्युअल गेज) – १२,३५० क्युसेक. गोदावरी नदी – अ) नांदूर मधमेश्वर धरण विसर्ग – ८,९३८ क्युसेक्स. ब) जायकवाडी धरण विसर्ग – ४७,१६० क्युसेक्स. प्रवरा नदी – अ) भंडारदरा धरण विसर्ग – ८,३० क्युसेक्स. ब) निळवंडे धरण विसर्ग – ६,५० क्युसेक्स. क) ओझर बंधारा विसर्ग – १,८९९ क्युसेक्स. घोड नदी – घोड धरण विसर्ग – १,२०० क्युसेक्स. मुळा नदी – मुळा धरण विसर्ग – ४,५०० क्युसेक्स असा विसर्ग सुरु होता.

आनंदी आयुष्यासाठी अनिवार्य आहे पर्यटन !
आणि पर्यटनासाठीचा बेस्ट सीझन आता सुरु आहे.
फॅमिलीला घेऊन तुम्ही कुठे निघताय ?
आपला अतुल्य भारत आणि अफलातून जग तुमची वाट बघतंय...

केरळला चहाच्या मळ्यात सैल शूट करताहेत...
दुबईच्या डेझर्टमध्ये फोर व्हिल ड्राईव्ह घेताहेत...
राजस्थानला पिचोला लेक मध्ये बोटिंग करताहेत..
पटाया टॉवरमध्ये जम्पचा रोमांच अनुभवताहेत...

जागतिक पर्यटनाच्या हार्दिक शुभेच्छा !

EMI सुविधा उपलब्ध.

चलो वॉर भरो निकल पडो..

सिंगापुर मलेशिया थायलंड 1,61,000/- १० दिवस सहा.कुटुंबास.	वाराणसी अयोध्या लखनौ 57,000/- ८ दिवस सहा.कुटुंबास.	बेस्ट ऑफ अंदमान 73,000/- ७ दिवस सहा.कुटुंबास.	
हनिमून शिमला मनाली 35,000/- ६ दिवस सहा.कुटुंबास.	नैनिताल मसुरी कॉर्बेट 41,000/- ६ दिवस सहा.कुटुंबास.	दुबई अबुधाबी 1,05,000/- ७ दिवस सहा.कुटुंबास.	
राजस्थान मेवाड 47,000/- ९ दिवस सहा.कुटुंबास.	सिक्कीम दार्जिलिंग 72,000/- ९ दिवस सहा.कुटुंबास.	हायलाईटस् ऑफ केरळ 36,000/- ६ दिवस सहा.कुटुंबास.	
काश्मिर हायलाईटस् 55,000/- ६ दिवस सहा.कुटुंबास.	बँकॉक पटाया फुकेत 1,16,000/- ८ दिवस सहा.कुटुंबास.	बेस्ट ऑफ नेपाळ 73,000/- ८ दिवस सहा.कुटुंबास.	

गीता वर्ल्ड टुर्स्ट व्हेल्स पार्टनर

राजलक्ष्मी हॉलिडेज्

प्रसाद श्रीकांत मांढरे
98500 63432
लालटाकी रोड, कालिका प्राईड, २ रा मजला, ऑफिस नं. २०५, अहमदनगर.

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999

Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite

सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

९ वे पुण्यस्मरण

स्व. कमलाबाई अमरलाल तलरेजा
स्व.दि. २६/०९/२०१५

सौम्यता उनकी सुगंध थी, आनंद उनका जीवन था ।
सत्कर्म उनकी शोभा और परोपकार उनका कर्तव्य था.

आपके पावन स्मृतिमें
भावपूर्ण श्रद्धांजली !

❊ शोकाकुल ❊

समस्त तलरेजा परिवार

वरद नेत्रालय
— नेत्रसेवेचा आधुनिक दृष्टिकोन —

मोफत रेटिना तपासणी शिबीर
(डोळ्यांच्या भागाचा पडदा)
सखलरीत्या दडत रेटिना शस्त्रक्रिया व उपचार

रविवार | 29 सप्टेंबर २०२४ | सकाळी ९० ते दुपारी २

लिक्विडची शस्त्रक्रिया सेवेलिप्तो
- नेत्रपटलाची सर्वांग तपासणी
- लक्षणांसोबत अचूक रिपोर्टिंग व मार्गदर्शन
- रेटिना आजार - निदान व उपचार

नोंदणी आवश्यक
प्रसाद भोजने 9850751846
किशान रोख 9881178866
शेखर रासीनकार 8329057574

परिपूर्ण नेत्रसेवेसाठी तज्ञ आणि अनुभवी डॉक्टर्स
डॉ. रावसाहेब बोरुडे
M.B.B.S., D.O.M.S. (Pune)
F.I.O.S. Phaco & Refractive Surgeon
डॉ. स्मिता प्रशांत पटारे
M.B.B.S., D.N.B. (Ophthalmology)
Fellowship in Glaucoma, Cataract, Cornea and Refractive Surgeon
डॉ. अक्षय साळे (रेटिना सर्जन)
M.B.B.S., (B.J GMC, Pune), (CORS), FVRS

सिद्धीजी दिव्यांग - होरेटर परिवार माने, वारसिमकाम रोड, बोरोडारगाव, सावेडी, अ.नगर प्रभाग ०५३
(0241) 2324680 | 2415600

EARTH's Green Library
Greenery for Every Space

Indoor Plants for your Home!

Get a Plant Today!
Indoor Plants | Potted Planters | Premium Planters
Garden Accessories | Garden Furniture | Garden Lightings

Amit Sanklecha 99231 43334
Website : greenlibrary.in

Opp. Ramadevi Temple, Next to Kamada Machine Tools, Zopadi Canteen, Savedi, AHMEDNAGAR - 414 003



GOLDSMITHS | NWS | SAKHARIYA | ANMOL INHERENTLY LUXE

डायमंड व गोल्ड ज्वेलरींचे
भव्य एक्झिबिशन

27 | 28 | 29
सप्टेंबर 2024

वेळ : सकाळी 10.30 ते सायं. 8 पर्यंत
स्थळ - हॉटेल आयरिस
स्टेशन रोड, अहमदनगर

For More Information Contact 9892398360
Event organised by drishti Events And Promotions Pvt. Ltd.
Follow us :

REVOLUTION in animation world
graphic designing
web designing
2d & 3d animation
18 MONTH PROGRAM

COURSE HIGHLIGHTS
Complete 3D Animation career program
Industry visits & workshops
Making a portfolio after every Module
E-Projects

CERTIFICATE COURSE IN
SOFTWARE PROGRAMMING

C Programming
C++ Programming
Data Structure, PHP
Python, Java
.Net
Duration : 6 Months

Delhi Gate Branch: 1st Floor, 204, Anand Kasliwal Heights, Above Sriwari Mall, Delhi Gate, Solapur, Maharashtra 413001 — 9371051769
Old ST stand Branch: 1st Floor, Amber Plaza, Near Lohiya Garden, Ahmednagar Road, Stand, Solapur, Pune, Kolhapur — 9371151769
Pipeline Branch: Office No. 202, Second Floor, Ruchira Garden, Bhimnagar Chowk, Pipeline Road, Solapur — 7447761769

An ISO 9001-2015 Certified
DISHA COMPUTER INSTITUTE

डॉ.अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन

❊ सर्व आजारांसाठी ऍडमिट सुविधा उपलब्ध.
❊ सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.

❊ डोकेदुखी, मायग्रेन ❊ फिटचे आजार, अपस्मार
❊ हातपायाला मुंग्या येणे, नसांवरील सूज
❊ तोल जाणे ❊ व्हर्टिगो, चक्कर येणे ❊ अधोगवायू, पॅरेलीसीस ❊ विसराळूपणा ❊ थरथर सुटणे, पार्किन्सन

यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निष्णेत- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.

अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे

एशियन नोबल हॉस्पिटल
प्रेमदान चौक, अ.नगर
रोज दुपारी १ ते ५ या वेळेत

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्धानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य बुंदेला

email - navamaratha@gmail.com

दिव्यांगाची नव्हे ही तर दिव्यत्वाची प्रचिती...

ऑलिम्पिकच्या काहीशा निराशाजनक कामगिरीनंतर पॅरीसला झालेल्या पॅरालिम्पिक स्पर्धेतील यश देशवासियांना सुखावणारे आहे. गौरवात भर घालणारे आहे. यावेळी या खेळाडूंनी सर्वाधिक पदकांची कमाई करून आपल्या पुढे आदर्श उभारलेत.

हा मुद्दा केवळ त्यांच्या मोठ्या यशाचा नसून यात आम्हा भारतीयांची बदलणारी मानसिकता आणि दृष्टीकोन हा आहे. या सर्व विशेष खेळाडूंच्या जिद्द, मेहनत, प्रयत्नांना सलामच करायला हवा. आपण सर्व सामान्यतः धडधाकट असूनही छोट्या-मोठ्या समस्या, अपयशांना घाबरतो.

शीतलदेवी... नाव लक्षात ठेवाच. जेव्हाही अशक्य, अडचण वाटेल तेव्हा तिची कामगिरी तुम्हाला जगणं शिकवेल. मोठी स्फूर्ती व प्रेरणा देईल. शीतल केवळ १७ वर्षांची युवती... दोन्ही हात गमावलेली शितल पायाने तिरंदाजी करणारी एकमेव खेळाडू असून, जागतिक क्रमवारीत पहिलं स्थान मिळवणारी जबरदस्त खेळाडू आहे. त्यामुळे तिचेच काय प्रत्येक दिव्यांग खेळाडूंचे आपण सर्वांनी कौतुक, प्रोत्साहन केलेच पाहिजे. युवापिढीनं त्यांचा आदर्श घ्यावा. क्रिकेटच्या अती कौतकातून बाहेर पडून शासन व आपण याकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे. इतकेच काय अशा प्रेरणादायींचे छायाचित्र शाळा, कॉलेजेस, ऑफिससेसमध्ये हवी.

"मुसाफिर"-९८२२०२०६९१

'पुणे ते छत्रपती संभाजीनगर महामार्ग' सुधारणा करताना गावांच्या बाहेरून काढण्यात यावा : मुख्यमंत्र्यांकडे मागणी

नगर - पुणे ते छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गाची सुधारणा करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, त्या मार्गादरम्यान येणाऱ्या गावांच्या बाहेरून या मार्गाचे रेखांकन करावे, अशी मागणी मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आली आहे.

यासंदर्भात नितीन थोरात यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन पाठविले असून, त्यात म्हटले आहे की, मंत्रिमंडळाने पुणे ते छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गाची सुधारणा करण्याचा निर्णय घेतलेला आहे. या मार्गावर ज्या ज्या ठिकाणी दोन्ही बाजूने मोठ्या प्रमाणावर बांधकाम झालेले आहे व बाजारपेठेचे स्वरूप आलेले आहे अशा ठिकाणच्या गावामधून रस्ता न नेता संबंधित गावाच्या बाहेरून बाह्यवळण रस्ता करण्यात यावा. शिरूर ते अहमदनगर या मार्गावर पथकर वसुली सुरू आहे. ती संपल्यानंतर हा मार्ग हस्तांतरित करण्यात येईल असे शासनाने म्हटले आहे. सदर पथकर वसुली पुढील १५ ते २० वर्षे तरी संपणार नाही. कारण हा रस्ता अलिकडच्या काळात झालेला आहे. पथकर वसुली आहे तशीच चालू ठेवावी किंवा बंद करावी परंतु वसुली संपण्यासाठी खूप मोठा कालावधी जाणार असल्याने दरम्यानच्या काळात वाहनांची वर्दळ मोठ्या संख्येने वाढणार आहे. सध्या या मार्गावरून नागरिकांना मोठ्या वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे. पुढील १५-२० वर्षानंतर या मार्गाचे काम सुरू केल्यास नागरिकांचा मोठा विश्वासघात होऊ शकतो. तरी सदर प्रकल्पाची सुरुवात तात्काळ करावी, अशी मागणी थोरात यांनी केली आहे.

रस्ता सुधारणेसाठी २ हजार ५० कोटी खर्च अपेक्षित

सध्याच्या पुणे- शिरुर-अहमदनगर- छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गाची सुधारणा करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. पुणे ते शिरुर हा ५३ कि.मी. चा मार्ग सहा पदरी उन्नत करण्यात येणार असून एम एसआयडीसीमार्फत हे काम केले जाईल. यासाठी ० हजार ५११ कोटी खर्च अपेक्षित आहे. शिरुर अहमदनगर बाह्यवळण रस्ता मार्ग छत्रपती संभाजीनगर हा सध्याचा रस्ता सुधारण्यासाठी २ हजार ५० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

शिरुर ते अहमदनगर या मार्गामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पथकर वसुली होत आहे. त्यामुळे ही पथकर वसुली संपल्यानंतर हा मार्ग हस्तांतरित करण्यात येईल. अहमदनगर ते शिरुर हा रस्ता सुधारण्यासाठी तो एमएसआयडीसीला हस्तांतरित करण्यात येईल. तसेच देवगड ते छत्रपती संभाजीनगर या मार्गावर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पथकर वसुली होत आहे. ती संपूर्णत आल्यानंतर हा मार्ग एमएसआयडीसीला हस्तांतरित करण्यात येईल.

कारमधून चाललेल्या महिलेच्या गळ्यातील गंठण मोटारसायकलवरील दोघा जणांनी हिसका मारुन पळविले

नगर - पतीसोबत कार मधून चाललेल्या वृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठण मोटारसायकल वर आलेल्या दोघा चोरट्यांनी हिसका मारून तोडत पळवून नेल्याची घटना शहरातील कायनेटीक चौकाजवळ रेल्वे उड्डाणपुलावर बुधवारी (दि.२५) सकाळी ११.३० च्या सुमारास घडली. अतिशय वर्दळीच्या रस्त्यावर ही चेन स्नॅचिंगची घटना घडल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

याबाबत राधिका अशोक घुले (वय ६१, रा.लिंक रोड, केडगाव) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी घुले व त्यांचे पती हे त्यांच्या कारमधून नगरहून केडगावकडे जात होते. फिर्यादी बसलेल्या बाजूची दरवाजाची काच खाली होती. कायनेटीक चौकातून पुढे गेल्यावर रेल्वे उड्डाणपुलावर त्यांच्या कारचा वेग कमी झाला, त्यावेळी फियांदी यांच्या बाजूने मोटारसायकलवर २ तरुण आले. त्यातील पाठीमागे बसलेल्या तरुणाने फियांदी यांच्या गळ्यातील सोन्याचे गंठण हिसका मारून तोडले व ते धेवून दोघेही भरधाव वेगात पसार झाले.

या ठिकाणी मोठी रहदारी असते. वाहनांची गर्दी असते. मात्र अचानक हा प्रकार घडल्याने फियांदी व त्यांचे पती गोंधळून गेले. त्यांनी आरडाओरडा केला मात्र तो पर्यंत ते चोरटे पसार झाले होते. त्यानंतर घुले यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात जावून फिर्याद दिली. या फियांदीवरून पोलिसांनी अज्ञात दोघा चोरट्यांच्या विरुद्ध जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

सौ.लताबाई पोकळे यांचे हृदयविकाराने निधन

नगर - नालेगाव येथील रहिवासी सौ.लताबाई बाजीराव पोकळे (वय ६७) यांचे २६ सप्टेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ॲड. हेमंत पोकळे व इंजिनियर वैभव पोकळे यांच्या त्या मातोश्री होत.

सौ. रेखाबाई मुथियान यांचे संथाराव्रतात निधन

नगर - येथील पार्श्वनाथ सोसायटी, विनायकनगर येथील रहिवासी सौ. रेखाबाई अनिल मुथियान (वय ६९) यांचे २५ सप्टेंबर रोजी संथाराव्रतात निधन झाले.

त्यांच्या मागे पती, २ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्या स्विटी बोरा, सुमित सेल्स्चे संचालक सचिन व सुमित मुथियान यांच्या मातोश्री होत.

जि.प. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची बदली करा अन्यथा ३० सप्टेंबरला उपोषण

सह्याद्री छावा संघटनेचा इशारा

नगर - जिल्हा परिषदेत अनेक चूकीच्या कामांना जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी पाठिशी घालत असल्याचा आरोप करून त्यांच्या बदलीची मागणी सह्याद्री छावा संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालया मार्फत ग्रामविकास सचिव व नाशिक विभागीय आयुक्तांना पाठविण्यात आले असून, या मागणीसाठी संघटनेच्या वतीने ३० सप्टेंबरपासून जिल्हाधिकारी कार्यालया समोर उपोषणाचा इशारा देण्यात आला आहे. यावेळी छावा संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष रावसाहेब काळे पाटील, धडक जनरल कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्रीधर शेलार, जिल्हा उपाध्यक्ष दत्ता वामन, छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष विनोद साळवे, महिला जिल्हाध्यक्षा तनीज शेख, संदीप शिंदे, रमेश पंडित, शिवाजी भोसले, भाऊसाहेब शिंदे, राजू महाराज पाटोळे, सहाद् दोंदे आदी उपस्थित होते.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी निकृष्ट व दर्जाहीन बोगस कामे करून पैसा लाटणाऱ्या ठेकेदारांवर कारवाई न करता त्यांना पाठिशी घालत आहे. निविदेनुसार अटी व शर्तीचे पालन

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची बदली करा या मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयात सह्याद्री छावा संघटनेच्यावतीने देण्यात आले.

मर्जीतले ठेकेदार करत नाही. जलसंधारण विभागातील सर्व कामे नियमबाह्य व चुकीची झालेली असल्याचा आरोप संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे.

या चूकीच्या कामांविरोधात तक्रार करुनही कुठलीही दखल न घेता ठेकेदाराचे बिल अदा करण्यात आलेले आहे. आलेल्या तक्रारीवर त्यांना कोणताही ठेकेदार दोषी दिसून आलेला नाही. जिल्हा परिषद विभागाने कलर काम देखील निकृष्ट कामाचे मटेरियल वापरून निकृष्टपणे करण्यात आलेले आहे. सदर रंगकामाची चौकशी होणे आवश्यक आहे.

इमारत बांधकाम कामगारांना प्रमाणपत्र न देण्याबाबत पाथर्डी व राहुरी बिडीओ यांनी लेखी नोटीस काढून शासनाच्या जीआरच्या उल्लंघन करून कायद्याचा मनमानी पद्धतीने अर्थ काढला. कायद्याच्या चौकटी बाहेर जाऊन काम केली. महाराष्ट्र नागरी सेवा हमी अधिनियमन (सेवा व शिस्त अपील) यांचे उल्लंघन करुन खोटी व बनावट माहिती इतरांना देऊन कामगारांचे नुकसान केले. पदाचा गैरवापर करणाऱ्या या अधिकाऱ्यांविरोधात लेखी तक्रार करुनही अद्याप पर्यंत त्यांच्यावर कारवाई झालेली नाही. शिक्षक मुख्यालयात न राहता भत्ता घेतात. याबाबत इतर सामाजिक कार्यकर्ते व संघटनांच्या वतीने तक्रारी होऊनही कुठलीही कारवाई झालेली नसल्याचे निवेदनात म्हंटले आहे. दोन वेळेस बदली झालेली असताना देखील त्यांना कोणाच्या आशीर्वादाने पुन्हा त्याच ठिकाणी बसविण्यात आले. ग्रामपंचायत विभागातील कर्मचारी, अधिकारी हे मनमानी पद्धतीने कारभार करत आहे. अनेक विभागांचा अधिकार एका अभियंताकडे सोपविण्यात आलेला आहे. अनेक विभागाचे कारभार त्याच्याकडे देण्यामागे काय गौडबंगाल आहे? याची देखील चौकशी होणे गरजेचे असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

सुभाषलाल ओस्तवाल यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - महात्मा फुले चौक, आनंद अपार्टमेंट येथील रहिवाशी सुभाषलाल मोतीलाल ओस्तवाल (वय ८२) यांचे २६ सप्टेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात २ मुले, २ मुली, सुन, नातवंडे असा परिवार आहे. मार्केटयार्ड मधील वर्धमान मशिनरीचे संचालक संतोष ओस्तवाल आणि सुरेश (बंडूशेठ) ओस्तवाल यांचे ते वडील होत.

ॲड. प्रकाश मेहता यांचे हृदयविकाराने निधन

नगर - धुलिया येथील रहिवासी ॲड. प्रकाश भंवरलाल मेहता (वय ८०) यांचे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर धुलिया येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. नगर येथील प्रकाश, दिलीप मुनोत (नेवासकर) यांचे ते दाजी होत.

सीएससी, सेतू व आपले सरकार केंद्रात सोयाबीन, कापुस उत्पादक शेतकऱ्यांना ई-केवायसी साठीची सुविधा उपलब्ध

नगर - शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी खरीप हंगाम २०२३-२४ मध्ये कापुस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना दोन हेक्टरच्या मर्यादेत प्रति हेक्टरी ५ हजार रुपयांचे अर्थसहाय्य देण्याची घोषणा राज्य सरकारने केली आहे. राज्यातील सन २०२३ च्या खरीप हंगामातील कापुस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना ०.२ हेक्टरपेक्षा कमी क्षेत्राच्ची सरसकट रू.१००० तर ०.२ हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्राशी त्यांच्या क्षेत्रानुसार प्रति हेक्टर रू.५००० (२ हेक्टरच्या मर्यादेत) अर्थसहाय्य अदा करण्यात येणार आहे. राज्यपरातील कापुस, सोयाबीन उत्पादकांना यांचा फायदा होणार आहे महाराष्ट्र जिल्ह्यामध्ये कापुस उत्पादक शेतकऱ्यांसाठी रू.६८.९२ कोटी व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी रू.१०७.१२ कोटी इतक्या खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

सन २०२३ च्या खरीप हंगामातील कापुस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना ०.२ हेक्टरपेक्षा कमी क्षेत्राशी सरसकट रू.१००० तर ०.२ हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्राशी त्यांच्या क्षेत्रानुसार प्रति हेक्टर रू.५००० (२ हेक्टरच्या मर्यादेत) अर्थसहाय्य. सदर शेतकऱ्यांना ऑनलाईन प्रणाली व सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीद्वारे शेतकऱ्यांच्या आधार लिंकड बँक खात्यामध्ये केवळ थेट लाभ हस्तांतरणच्या (DBT) माध्यमातुनच अर्थसाहाय्य जमा करण्यात येईल. कापुस व सोयाबीन अर्थसाहाय्य योजना अंतर्गत करावयाची ई- केवायसी साठीची सुविधा CSC सेंटर, सेतु कार्यालय, आपले सरकार केंद्र येथे सुद्धा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

२९ सप्टेंबरपर्यंत अर्थसहाय्याच्या रक्कमा शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर थेट वर्ग होणार असल्याने तात्काळ शेतकऱ्यांनी ई-केवायसी करून घेण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी केले आहे.

माळी महासंघाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी किरण अंत्रे यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

माळी महासंघाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी किरण अंत्रे



नगर - अहिल्यानगर येथील नक्षत्र लॉन येथे नुकतीच माळी महासंघाची बैठक पार पडली. या बैठकीत जिल्हाच्या तसेच तालुक्यांच्या अनेक पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. याच बरोबर राहुरी तालुक्यातील सोनगाव येथील माजी उपसरपंच किरण पाराजी अंत्रे पाटील यांची माळी महासंघाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. या निवडीचे पत्र माजी महापौर भगवान फुलसौंदर यांच्या हस्ते देण्यात आले.

तसेच श्री. फुलसौंदर यांच्या वतीने नवनिर्वाचित पदाधिकारी यांचे संत सावता महाराज, महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांची एकत्रित प्रतिमा भेट देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी माळी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष अरुण तिखे, डॉ. प्रमोद तांबे, राम पानमळकर, जिल्हाध्यक्ष भूषण मुजबल, राहुल साबळे, नंदकुमार नेमाने, गणेश धाडगे, संदीप दळवी, तुषार फुलारी, यश भांबरकर, आकाश फुले, जयश्री व्यवहारे, राजेंद्र बोरुडे, सुभाष गोंधले, गोरक्षनाथ गाडेकर, विकास रासकर, गणेश पेहरे, सुवर्णा शेलार, छाया विपाडे, अभिजीत बोरुडे, दिपक साखरे, संजय राउत, कैलास व्यवहारे, अनिल अनाप, नरेंद्र अनाप, संतोष अंत्रे उपस्थित होते.

श्रीकांत क्षीरसागर यांचे अपघाती निधन

नगर - कोपरगाव तालुक्यातील पुणतांबा येथील रहिवासी श्रीकांत कैलास क्षीरसागर (वय ३२, मूळ गाव कोकमठाण) यांचे २३ सप्टेंबर रोजी अपघाती निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, आई, वडील असा परिवार आहे. त्यांच्या अकाली निधनाबद्दल हळहळ व्यक्त होत आहे. अहमदनगर येथील श्री रेणुका ट्रॅव्हल सर्व्हिसेसचे संचालक श्यामकांत क्षीरसागर यांचे ते पुतणे होत.

जुन्या पिढीतील शिक्षक सुरेश भाटे यांचे निधन

नगर - श्रीरामपूर येथील जुन्या पिढीतील शिक्षक सुरेश काशिनाथ भाटे उर्फ भाटे सर (वय ८४) यांचे पुण्यात निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, जावई, सून, नातवंडे असा परिवार आहे.

हिंद सेवा मंडळाच्या श्रीरामपूर येथील करमशी जेठाभाई सोमैय्या हायस्कूलमध्ये ते बराही वर्षे उपमुख्याध्यापकही होते. हिंद सेवा मंडळाची कर्मचाऱ्यांची पतसंस्थेचे ते संस्थापक सदस्य होते. अहमदनगर येथील वास्तुतज्ज्ञ डॉ. कौस्तुभ काळे यांचे ते सासरे होत.

मृदानी चोथाणी हिचे अल्पशः आजाराने निधन

श्रीरामपूर - येथील कु. मृदानी कल्पेश चोथाणी (वय १८) हिचे अल्पशः आजाराने दुःखद निधन झाले.

जयंतभाई व गोवर्धन प्रेमजी चोथाणी यांची नात, तुषार चोथाणी यांची पुतणी, कल्पेश व पारुल चोथाणी यांची कन्या होय.

केडगावमधील महिलेची इंस्टाग्रामवर बदनामी

नगर - केडगाव उपनगरात राहणाऱ्या एका विवाहित महिलेचे फोटो आणि त्या खाली अश्लील मजकूर इंस्टाग्राम या सोशल मिडिया साईटवर पोस्ट करत महिलेची बदनामी केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी पुण्यातील एक महिला व तिच्या पती विरोधात कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सदर पिडीत महिलेने फियांद दिली आहे. फियांदी महिला ही केडगाव उपनगरात राहते, तिला इंस्टाग्रामवर तिचा फोटो आणि त्या खाली अश्लील मजकूर कोणी तरी पोस्ट केला असल्याची माहिती मिळाली. याबाबत तिने अधिक माहिती घेतली असता सदर पोस्ट पुणे येथील एका महिलेने टाकली असल्याचे निदर्शनास आले.

फियांदी महिलेने व तिच्या नातेवाईकांनी त्या महिलेशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केल्यावर त्या महिलेने आणि तिच्या पतीने फियांदी महिलेला व तिच्या नातेवाईकांना फोनवरून अश्लील शिवीगाळ करत धमकी दिली असल्याचे या महिलेने फियांदीत म्हंटले आहे. या फियांदी वरून पुण्यातील दोघांवर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

सदाबहार अभिनेते : देव आनंद

हिंदी चित्रपट सृष्टीतील सदाबहार, चिरतरुण आणि चॉकलेट हिरो असे ज्यांचे वर्णन केले जायचे ते जेष्ठ सिनेअभिनेते दिवंगत देव आनंद यांची आज १०१ वी जयंती.

१०१ वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे २६ सप्टेंबर १९२३ रोजी त्यांचा जन्म झाला. हे त्यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. देव आनंद यांचे मूळ नाव देवदत्त पिशोरीमल आनंद असे होते. लहानपणापासूनच त्यांना अभिनयाची आवड होती. लाहोरमधील कॉलेजमध्ये १९४२ साली त्यांनी संगीतात ग्रॅज्युएशन पूर्ण केले. तिथेच त्यांची सुझवंत सिंग व बलराज साहनी यासारख्या दिग्गज व्यक्तिमत्वाशी भेट झाली. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी काहीकाळ नौकरीही केली मात्र नोकरीत त्यांचे मन रमले नाही. लवकरच त्यांनी नोकरी सोडून चित्रपटाची वाट धरली. प्रभात कंपनीच्या 'हम एक हैं' या चित्रपटातून त्यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत प्रवेश केला. मात्र त्यानंतर त्यांचे सलग चित्रपट आपटले. त्यांच्याच कंपनीचा म्हणजे 'नवकेतन'चा 'अफसरण हा चित्रपट देखील पडला मात्र या अपयशाने ते डगमगले नाही. 'अपना भी टाइम आयेगा....' असे ते त्यावेळी निर्मात्यांना म्हणत असत.

त्यांनी अभिनय केलेला 'बाजी' हा चित्रपट पडद्यावर आला आणि त्यांचे हे बोल खरे ठरले. बाजी हा चित्रपट तिकीट बारीवर यशस्वी ठरला. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली या चित्रपटाने त्यांना नायक म्हणून मान्यता दिली. या चित्रपटानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही.

जैसांचा तुरा, गुलझब्बू आणि देखणी चेहरेपट्टी यामुळे उठून दिसणाऱ्या व्यक्तिमत्त्वाने प्रेक्षकांच्या हृदयात स्थान मिळवले. ते प्रेक्षकांचे आवडते नायक बनले. त्यांचे सर्व चित्रपट हिट होऊ लागले. बाजी, मुनीमजी, दुष्मन, कालाबाजार, सीआयडी, पेईंग गेस्ट, गॅम्बलर, तेरे घर के

सामने, काला पाणी, जाल, गाईड, तेरे घर के सामने, छुपा रुस्तम, हरे रामा हरे कृष्णा, हिरा पन्ना, देस परदेस, ज्वेल थिफ, जॉनी मेरा नाम, अव्वल नंबर, स्वामी दादा असे त्यांचे सर्वच चित्रपट यशस्वी ठरले. १९५० ते १९७० असे जवळपास दोन दशके त्यांनी हिंदी चित्रपट सृष्टीवर अधिराज्य गाजविले.

राज कपूर आणि दिलीप कुमार यांच्यासारख्या तगड्या नायकांसोबत त्यांनी मोठे आव्हान उभे केले. त्याकाळात या तिघांना हिंदी चित्रपट सृष्टीतील 'त्रिदेव' असे म्हंटले जायचे कारण या तिघांनी तो काळ अक्षरशः गाजवून सोडला होता. देव आनंद आणि राज कपूर यांच्यापेक्षा देव आनंद यांचे चाहते अधिक होते. विशेषतः त्या काळातील तरुणाईने त्यांना डोक्यावर घेतले होते. त्यांचा चित्रपट फर्स्ट डे फर्स्ट शो पाहण्यासाठी तरुण कॉलेज सोडून चित्रपट गृहाबाहेर रांगेत उभे असायचे. तरुण मुली तर त्यांच्यासाठी अक्षरशः वेडाच झाल्या होत्या. त्यांची एक झलक पाहण्यासाठी मुली घरातून फळून मुंबईला येत असत.

त्यांच्या यशात त्यांच्या गाण्यांचा देखील खूप मोठा वाटा आहे. त्यांच्या बहुतेक चित्रपटाला सचिन देव बर्मन यांचे संगीत लाभले. सदाबहार गायक किशोर कुमार हे त्यांच्यासाठी गाणी गात. संगीतकार सचिन देव बर्मन, गायक किशोर कुमार आणि पडद्यावरील नायक देव आनंद हे त्रिकूट असे काही जमले की त्यांच्या अनेक गाण्यांनी इतिहास घडवला. 'रू कश ये बता', 'देखो रुठो ना करो', 'एक घर बनाएंगे तेरे घर के सामने', 'दिल का भवर करे रे पुकार', 'गाता रहे मेरा दिल', 'मैं जिंदगी का साथ निभाता चला गया', 'चुडी नही मेरा दिल दिल है दिल', 'फुलो का तारों का सबका कहना है', 'दिन ढल जाये', 'छोड दो आंचल जमाना क्या कहेगा' यासारखी त्यांची असंख्य गाणी आजही लोकप्रिय आहेत. आजही ही गाणी आवर्जुन ऐकली जातात.

देव आनंद यांनी केवळ चित्रपटात अभिनयच केला असे नव्हे तर त्यांनी काही चित्रपटांसाठी पटकथा लेखन केले तर काही चित्रपटांचे दिग्दर्शनही केले. आंधिया, हरे रामा हरे कृष्णा, हम नौजवान, अव्वल नंबर, प्यार का तराना, गॅंगस्टर, मैं सोलह बरस की, सेन्सॉर या चित्रपटासाठी त्यांनी पटकथा लेखन केले तर हिरा पन्ना, देस परदेस, लूटमार, स्वामी दादा, सच का बोलबाला, अव्वल नंबर अशा काही चित्रपटांचे दिग्दर्शनही केले.

त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. अभिनयासाठी त्यांना अनेक फिल्मफेअर पुरस्कार तर मिळालेच पण भारत सरकारकडूनही त्यांना मानाचा 'पद्मभूषण' पुरस्कार मिळाला. चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार समजला जाणारा 'दादासाहेब फाळके पुरस्कार'ही त्यांना मिळाला.

३ डिसेंबर २०११ रोजी त्यांचे निधन झाले. जवळपास पाच दशकांहून अधिक काळ आपल्या अभिनयाने चित्रपट रसिकांच्या मनावर मोहिनी घालणाऱ्या या सदाबहार अभिनेत्याला त्याच्या १०१ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

गृहिणी

आरोग्य

जांभूळ खा मधुमेह नियंत्रीत ठेवा

जांभूळ बी व साल ही मधुमेह या आजारावर अत्यंत उपयुक्त आहे. जांभूळ बी १५० ग्रॅम, हळद ५० ग्रॅम, आवळा ५० ग्रॅम, ५० ग्रॅम मिरे, ५० ग्रॅम कडुलिंब पाने, ५० ग्रॅम कारले बी यांचे चुर्ण एकत्र करून सकाळी व संध्याकाळी जेवणानंतर दोन चमचे घ्यावे. यामुळे मधुमेह हा आजार आटोक्यात आणण्यास मदत होते.

पाककला

मिल्क कॅन्डी

साहित्य : अर्धा लिटर दूध, पाव लिटर दही, एक किलो साखर, एक वाटी पिठीसाखर, चारोळी, बदामाचे काप, वेलदोड्यांची पूड.

कृती : दूध गरम करून, नंतर गार करून घ्यावे. कल्हईचे पातेले घेऊन त्यात दूध, दही व साखर एकत्र करून मिश्रण करावे. नंतर विस्तवावर ठेवून ते मिश्रण चांगले घोटावे.

मिश्रण घट्ट होत आल्यावर ते खाली उतरवून, त्यात पिठीसाखर व वेलदोड्यांची पूड घालून चांगले मिसळावे व ताटाला तुपाचा हात लावून त्यावर ते मिश्रण थापावे. त्यावर बदामाचे काप व चारोळ्या घालून लहान लहान वड्या पाडाव्यात.

वास्तू

असे झोपणे ठरते लाभदायी

* झोपताना डोके दक्षिण दिशेस असावे तर पाय उत्तरेस असावेत. दिशा वास्तुमध्ये जिथे मुख्य दिशा वास्तूच्या कोपऱ्यांमध्ये व उपदिशा मधोमध येण्याने झोपताना डोके दक्षिणेस करून झोपणे शक्य असतेच असे नाही. अशा वेळी प्रथम प्राधान्य नैऋत्य दिशेस व द्वितीय प्राधान्य आग्नेय दिशेस डोके ठेवून झोपण्यास देणे उचित ठरते.

सल्ला

पाक केल्यानंतर साखरेचे पुन्हा कण बनू नयेत यासाठी पाकात थोडे लिंबू पिळावे.

सौंदर्य

* रोज सकाळी एक ग्लास कोमट पाण्यात १ चमचा मध व अर्धे लिंबू पिळून ते पाणी पिल्याने शरीर बांधेसूद राहते.

* मध शरीराला लावून अंघोळ केल्याने त्वचेला चमक येते व त्वचा नितळ होते.

संकलक : अॅड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. २७ सप्टेंबर २०२४

एकादशी श्राद्ध. शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, भाद्रपद कृष्णपक्ष. पुष्य २५।२१. सूर्योदय ०६ वा. २७ मि. सूर्यास्त ०६ वा. ३१ मि.

राशिभविष्य

मेष : अधिकार क्षेत्र वाढेल. शत्रूंना भीती वाटेल. आनंद वाढेल. आर्थिक स्थिती संमिश्र राहील.

वृषभ : अत्यंत व्यस्त राहाल. हसत खेळत दिवस जाईल. कौटुंबिक वातावरण उत्तम राहील. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

मिथुन : व्यापार व्यवसायात सावध न राहिल्याने नुकसान होईल. कुटुंबातही वेळ चांगला जाईल. राजकीय कार्य पूर्ण होईल.

कर्क : सर्व कामे योग्य वेळी पूर्ण करण्यासाठी आज आपण नियोजन कराल. वाहने काळजीपूर्वक चालवा. पाकीट व मौल्यवान वस्तू चोरी जाण्याची शक्यता आहे.

सिंह : महत्वाच्या एखाद्या सामुदायिक योजनेत इतर लोकांबरोबर आपले सहकार्य तुमची उत्तम राजकीय जाण दाखवेल. हितशत्रू डोके वर काढतील.

कन्या : कौटुंबिक प्रश्नांची उत्तरे मिळतील. वेळेचे भान पाळाल. आरोग्य उत्तम राहील. महत्वाची कामे होणार नाहीत.

तूळ : कामात अत्यंत व्यस्त राहाल. खर्च वाढेल. महत्वाच्या कार्यात यश मिळेल.

वृश्चिक : कौटुंबिक जबाबदारी वाढेल. एखाद्या महत्वाच्या प्रोजेक्टमध्ये यश मिळेल. व्यापार व्यवसायात सावध राहाल.

धनु : अधिकाऱ्यांशी वाद-विवाद टाळण्याचे प्रयत्न करा. विरोधक पराभूत होतील. आरोग्य उत्तम राहील. पत्र मिळेल. आपल्या आरोग्याची काळजी घ्या.

मकर : अधिकारी आपणास सहकार्य करतील. आरोग्य उत्तम राहील. महत्वपूर्ण कामे यशस्वीरित्या पूर्ण होतील.

कुंभ : मनोरंजनावर खर्च होण्याची शक्यता आहे. प्रेमात स्थिती अनुकूल राहील. महत्वाच्या कामांमध्ये सावधगिरी बाळगा. मुलांवर खर्च होईल.

मीन : स्थिती अनुकूल राहील. दिवस उत्तम राहील. नवीन करार होतील. नोकरदार व्यक्तींसाठी स्थिती अनुकूल राहील.

संकलक : अॅड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

हसा आणि शतायुषी व्हा!

अक्षर

एकाने आपल्या डॉक्टर मित्राला जेवायचे आमंत्रण दिले. उत्तरादाखल डॉक्टरांनी चिठ्ठी पाठवली. यजमानांना ती काही वाचता येईना. त्यांची पत्नी हुशार होती. चिठ्ठी घेऊन समोरच्या मेडिकल स्टोअरमध्ये गेली. दुकानदाराने ती वाचली. चटकन आत गेला. बाईंना बोलू न देताच त्यांच्यापुढे फ्रीजमधून आणलेली बाटली ठेवली व म्हणाला ५५ रु.

...चला करू स्पर्धा परीक्षांची तयारी

* गाजर या वनस्पतीत हे जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असते – अ जीवनसत्त्व
* मूत्रपिंडाच्या विकारावर ही उपचार पद्धती लागू करावी लागते – डायलिसीस
* होमरुल चळवळ यांनी सुरू केली – लोकमान्य टिळक
* पालघर जिल्ह्यात या ठिकाणी परदेशी मालाची होळी करण्यात आली – सातपाटी

संदर्भ – 'कॉम्पिटिशन सक्सेस (जनरल नॉलेज) इंग्रजी मासिक
मराठी अनुवाद – अरविंद ब्राम्हणे, भिंगार मो. ९४०३७३४२८१

फिल्मीचक्कर क्र. ११५६

सौ. शैलजा कुलकर्णी

आडवे शब्द :- १) गोविंदा, शिल्पा शेट्टी, दिव्या दत्ता, कादरखान यांचा एक चित्रपट ४) ++ इन टोकियो (चित्रपटाचे नाव) ५) आंसू ++ ++ ++ ++ (चित्रपटाचे नाव) ८) जॅकी श्रॉफ, अमृतासिंग यांचा एक चित्रपट १०) राव ++ ++ (चित्रपटाचे नाव) ११) ++ अग्निहोत्री (अभिनेत्री) १२) 'एक दूजे के लिये' चित्रपटातील कमल हसनचे नाव १४) ++ आयेगा मजा (चित्रपटाचे नाव) १५) +++ गरम (चित्रपटाचे नाव)

उभे शब्द :- १) राजेश खन्ना, शर्मिला टागोर यांचा एक चित्रपट २) ऋषी कपूर, जयाप्रदा यांचा एक गाजलेला चित्रपट ३) आया +++ ++ + (चित्रपटाचे नाव) ६) 'तू चीज बडी है मस्त मस्त' गाण्याचा चित्रपट ७) +++ कहे पुकार के (चित्रपटाचे नाव) ८) माया ++++ (चित्रपटाचे नाव) ९) अजय देवगण, करिश्मा कपूर, मनीषा कोईराला यांचा एक चित्रपट १०) औरत +++ +++ (रेखा, राकेश रोशनचा चित्रपट) १३) ++ संगम (चित्रपटाचे नाव)

* * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : अॅड.सौ. पूजा गुंदेचा

सुविचार : प्रेम सर्वांवर करावे परंतु श्रद्धा आणि विश्वास फक्त परमेश्वरावरच ठेवावा.

मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

जगातली सात आश्चर्ये आज कुठं आहेत?

पूर्वीच्या काळी ईजिप्तचे पिरेमिड, बॅबिलॉनची झुलती बाग, मुसोलसची कबर, डायनाचे मंदिर, हेलिऑसच्या होझसचा भव्य पुतळा, झिअसचा पुतळा, अलेक्झांड्रियाजवळचा फारोसचा दीपस्तंभ अशी सात आश्चर्य मानली जायची. यांतले आता फक्त पिरॅमिड्स शिल्लक आहेत. सर्वात मोठा पिरॅमिड म्हणजे गिझाचा पिरॅमिड. खूफू या इजिप्शियन राजाची नि त्याच्या राणीची ही कबर असे मानले जाते.

दुसरे आश्चर्य म्हणजे बॅबिलॉनची झुलती बाग. नेबुचाडनेझार या राजाने सुमारे २५०० वर्षांपूर्वी आपल्या राणीची इच्छा पूर्ण करण्यासाठी राजवाड्यांच्या भिंतींवर राजवाड्याच्या चारी बाजूंनी बागा निर्माण केल्या. इ. स. ५१४ मध्ये पर्शियाने बॅबिलॉनवर जो हल्ला केला त्या हल्ल्यात या बागा नष्ट झाल्या.

मुसोलसची कबर हे प्राचीन काळातले तिसरे आश्चर्य. मुसोलसच्या मृत्यूनंतर त्याच्या राणीनं ही कबर बांधली. ही कबर अंदाजे १०० फूट (३० मीटर) उंच होती आणि त्या कबरीवर एका भव्य रथातून राजा व राणी विहार करताहेत असा मोठा पुतळा होता. सिकंदरानं हालिकार्नासस्वर जो हल्ला केला, त्या हल्ल्यात ही कबर मोडली गेली. म्हणजे आश्चर्य फार काळ टिकले नाही. एफेसस्च्या डायनाचे मंदिर हे ६० फूट (१९ मीटर) उंचीच्या खांबावर उभारलेल्या छतामुळे जगातील चवथे आश्चर्य मानले जात असे. तुर्कस्तानच्या पूर्व भागात इ. स. पूर्व ३५० मध्ये हे बांधण्यात आले होते. हे फार पवित्र आणि सुरक्षित मानण्यात येत असे. अनेक लोक प्रवासास जाताना आपली संपत्ती इथे ठेवून जात. इ. स. २६२ मध्ये याचा नाश झाला.

हेलिऑसच्या होझसचा कांशाचा पुतळा १०० फूट (३० मीटर) उंच होता. इ. स. पूर्व २८० मध्ये हा उमाराप्यात आला आणि सुमारे ६० वर्षांनंतर एका भूकंपात तो नष्ट झाला.

ऑलिंपिया येथल्या झिअस (इंद्र) चा पुतळा हे जगातले सहावे आश्चर्य. त्या काळातला आघाडीचा शिल्पकार फिडियास याने इ. स. पू. ४५० मध्ये हा पुतळा घडवला. या ३० फूट (९ मीटर) उंचीच्या पुतळ्याचे कपडे सोन्याचे; शरीर हस्तिदंताचे आणि डोळे हिऱ्याचे होते. ख्रिस्तीधर्मीयांनी या पुतळ्याचा नाश केला.

इजिप्तमध्ये अलेक्झांड्रियाजवळच्या फारोस द्वीपकल्पावर पांढरा संगमरवरी दीपस्तंभ बांधण्यात आला. इ. स. पू. २८० मध्ये बांधलेला हा दीपस्तंभ ४०० फूट (१२० मीटर) उंचीचा होता. बारावा शतकात म्हणजे जवळजवळ १४०० वर्षांनी हा दीपस्तंभ कोसळला.

जित्याची खोड

बाईला दररोज तिच्या गरजेच्या वस्तू पुरवायच्या. एकेक करून प्रत्येक घरातून त्या बाईसाठी जेवणाचा डबाही पुरवायचा. त्यामुळे तिचा संबंध गावाशी येणार नाही आणि तिचे वाईट बोलणेही कुणाला ऐकावे लागणार नाही. सारे तिच्याकडे गेले आणि म्हणाले,

'आम्ही रोज तुम्हाला जेवणाचा डबा पाठवू. शिवाय तुमच्या गरजेच्या वस्तूही पुरवू मात्र विनंती एवढीच की, गावात तुम्ही येऊ नका, कुणाला शिव्याशाप देऊ नका.'

ते ऐकून ती बाई अतिशय आनंदित झाली आणि म्हणाली,

'वा! वा! अतिशय छान, मला तरी कुठे गावात हिंडत फिरायची हौस आहे? पण मला डबा आणि वस्तू दररोज मिळायला हव्यात, मग तुमच्या घरात चोरी झाली, कुणी मेले किंवा तुमची शेते जळाली तरी मला काही देणे घेणे नाही.'

तात्पर्य : एखाद्याच्या कितीही मनासारखे केले तरी त्याच्या स्वभावाला औषध नाही.

एका गावात एक बाई राहत होती. एक दुष्ट स्त्री म्हणून ती साऱ्या गावात ओळखली जात होती. कारण ती स्त्री कुणाबद्दल कधीच चांगले बोलत नसे. लोकांना शिव्याशाप देणे, वाईट चिंतणे हाच तिचा स्वभाव होता. त्यामुळे सारे गाव तिला कंटाळले होते. परंतु या ना त्या कारणाने तिचा संबंध गावाशी येतच होता. बरे तिला गावातून निघून जा, असेही म्हणता येत नव्हते.

गावात सरपंच आणि पंच मंडळाने असा निर्णय घेतला की, गावातल्या प्रत्येक घरातून त्या

जीवन चक्र – मृत्यू रहस्य (जीवन की रोशनी)

इस परविद्या में तर्क और दलील के लिए कोई स्थान नहीं। विश्वास और भरोसा केवल देखने से ही आता है। ज्योतियों की ज्योति, ज्योतियों का स्रोत स्वयं ज्योति स्वरूप परमात्मा, नूरों का नूर और मनुष्य की रूह या आत्मा जो ईश्वरीय ज्योति की ही एक बून्द है और भिन्न-भिन्न शरीरों में लिपटी होने के कारण एक अलग आत्मा बन चुकी है, दोनों इस नर नारायणी देह के अन्दर रहते हैं परन्तु कितने आश्चर्य की बात है कि एक दूसरे के निकट रहते हुए भी आत्मा उसे देख नहीं रही क्योंकि इस जल रहे सुनसान जंगल रूपी शरीर को भूल से हम अपना निज घर समझ बैठे हैं। सन्त न केवल हमें सचाई और अपनी असली विरासत के बारे में बताते ही हैं बल्कि यीशु मसीह की तरह घोषणा करते हैं: अर्थात् मैं तुम्हें परमात्मा की बादशाहत की

२. जीवन की रोशनी

चाबियाँ दूंगा। इसी तरह गुरु नानक साहब फरमाते हैं:– गुरू कुंजी पाइ निवलु मनु कोठा तनु छति ।।

नानक गुर बिन मनका ताकु न उघड़े अवर न कुंजी हथि। (सारंग की वार मः५) परन्तु हम में से कितने ऐसे हैं जो इन पवित्र वचनों पर विश्वास करते हैं और कितने हैं जो आँखों के पीछे स्थित बज्र कपाट को खोलने और उस प्रभु की बादशाहत को स्वीकार करने के लिए तैयार हैं। इससे भी कम उस शब्द को सुनने के लिए तैयार हैं जिसके बारे में यशु मसीह का फरमान है:– जो मेरे शब्द को जाता है। है, मौत को पार करके जीवन में चला सुनता (बाईबल)

हर रोज़ हम बड़े ज़ोर–ज़ोर से प्रार्थना करते हैं कि मुझे झूठ से सच, अंधेरे से रोशनी और मौत से अमरत्व की ओर ले चल। कितनी आश्चर्यजनक और आपाविरोधी बात है कि थीबी दैत्य सइफिंकस द्वारा कही पहेलियाँ या अमृत सरोवर के रक्षक यक्ष द्वारा पाण्डवों को पेश की गई पहेलियों से भी ज्यादा आश्चर्य जनक जिनको हल करने और अपनी प्यास बुझाने वे गये, सिवाय युधिष्ठिर के ऐसा न कर सके और एक–एक कर के पत्थरों के रूप में बदल गये। क्या हम दूसरी निर्जीव वस्तुओं की तरह असल में मुर्दों वाला जीवन ही तो नहीं जी रहे किसी शांति के राजकुमार की प्रतीक्षा में कि कहीं हम आये और इन पौराणिक सफिंकस और यक्ष जो अजगर की तरह हमारे ऊपर कड़ी निगरानी रखते हैं कि कहीं हम गोल्डन फ्लीस (पौराणिक सुनहरी सत्र वाली ऊन) द्वारा जैशन की तरह लुभावने शिकार के लालच में खिंचे हुए उनके राहों में से बचकर न निकल जायें, को जीतकर हमें एक बार फिर जीवित करे । यह जीवन की वह पहेली है जिसे हमें हल करना है क्योंकि इसे हल किए बिना हमारा यह छोटा सा अस्तित्व बौना होकर रह जाएगा। (क्रमशः)

(कृपाल आश्रम, अहमदनगर)

शुद्ध जीवन जीने के मंत्र

१.४ छोटे समूह में बातचीत। (३० मिनट) एक परिवार के रूप में दायरा बनाकर बैठें। एक सदस्य स्नेहपूर्ण कथन सुनने के लिए बैठेगा और बाकी सारा परिवार उसे बताएगा कि वे उसे क्यों पसंद करते हैं, उसमें क्या–क्या खूबियाँ हैं। वे उसे क्यों पसंद करते हैं। सबसे स्नेह व प्रशंसा पानेवाला सदस्य अपना आभार प्रकट करने के बाद सबको अपना पोस्टर दिखाएगा। वह अपनी तीन खूबियों को पहचानेगा, जिन्हें वह निरंतर विकसित करना चाहता है। बाकी सदस्य उसकी सफलता के लिए शुभकाम नाएँ देंगे। (चाहें तो) बाकी सभी सदस्य समवेत स्वर में भी अपना आशीर्वाद और शुभकामना दे सकते हैं; जैसे– 'बैकी, तुम एक दृढ़ संकल्प रखनेवाली आत्मा हो। बैकी, तुम प्रसन्नमना आत्मा हो।' उस समय इन शब्दों को सुननेवाला सजग भाव से सभी आशीर्वादों को ग्रहण करेगा और उन्हें याद रखेगा।

२. एक साथ मिलकर सीखना – २.१ निम्नलिखित प्रश्नों के उत्तर देने के लिए व्यक्तिगत

२. अपने आप से प्रेम करना

रूप से १०–१५ मिनट का समय दें– आपको कौन सा हिस्सा सबसे अधिक अच्छा लगा? आपको कौन सा भाग कम आनंददायक लगा? आपने अपने बारे में जो सुना, उसके आधार पर अपने बारे में क्या जाना ? आप इस समय अपने बारे में कैसा अनुभव कर रहे हैं? आप परिवार के हर सदस्य के बारे में कैसा महसूस कर रहे हैं?

आप अपने स्वाभिमान की अवस्था कैसे बनाए रखेंगे? आपको इस प्रयास के लिए अपने परिवार से किस समर्थन की आवश्यकता होगी ?

२.२ छोटे समूह की आपसी बातचीत। (२०–२५ मिनट) एक परिवार के रूप में पुनः दायरा बनाएँ और अपने मनन व शिक्षण को आपस में बाँटें। परिवार की इस बातचीत को उनके द्वारा चुना गया एक रिपोर्ट नोट करेगा।

२.३ विशाल समूह की रिपोर्टिंग। (२०–२५ मिनट) हर रिपोर्टर विषय तथा प्रक्रिया के अनुसार अपने–अपने परिवार के बारे में विस्तार से बताएगा।

२.४ वार्त्तालाप (५–१० मिनट) शिक्षण तथा व्यावहारिक रूप से लागू करने के बिंदुओं को संक्षिप्त रूप दें। वार्त्तालाप के लिए अन्य विचार – एक स्वस्थ रूप से क्रियाशील परिवार को विकसित करने के लिए आत्म– सम्मान तथा परस्पर सम्मान का भाव होना आवश्यक है।

स्वस्थ संबंध सकारात्मक विशेषताओं के लेन–देन के सूचक हैं; जैसे– शांति, प्रेम व सहयोग आदि। ऐसा प्रभावी रूप से करने के लिए हमें आत्म–सम्मान की आवश्यकता होगी।

यदि हम अपने मूल्यों के प्रति सजग होंगे तो बहुत ही सशक्त तथा आत्मविश्वासी होंगे। तब दूसरों में भी इन विशेषताओं को देख पाना सरल होगा।

(क्रमशः)

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

कधीकधी प्रसूतीनंतर नवजात बालकालाही मधुमेह असू शकतो. म्हणून बाळाच्या जन्मानंतर त्याची रक्ताचील साखर तपासून घ्यावी.

मधुमेहासाठी आवश्यक तपासण्या या आजारामध्ये १) उपाशीपोटी रक्ताचील साखरेचे प्रमाण १२० मिलिग्रॅमपेक्षा जास्त (नॉर्मल ७०–११० मिलीग्रॅम) असते.

२) जेवणानंतर दोन तासांनी १८० मिलिग्रॅम पेक्षा जास्त (नॉर्मल ८०–१६० मिलीग्रॅम) असते. तसेच लघवी मधून सुद्धा मधुमेहाचे निदान करता येते. मधुमेह अल्प विषबाधक स्वरूपाचा आजार आहे. त्याकडे योग्य वेळी लक्ष न दिल्यास शरीरातील ऐकेक अवयव निकामी होऊन त्या अवयवांचे आजार होतात. असे होऊ नये म्हणून दर तीन महिन्यांनी रक्ताचील साखरेचे प्रमाण तपासावे. इतर अवयव निकामी व्हायला लागले आहेत का, हे समजण्यासाठी त्या–त्या अवयवांसंदर्भात तपासण्या कराव्यात.

१) हृदयासाठी : ई.सी.जी., टू–डी इको, स्ट्रेस टेस्ट प्रत्येक वर्षी करावी.

२) किडनीसाठी : लघवी तपासणी, तसेच किडनीची कार्यक्षमता बघण्यासाठी Blood Urea, Serum Creatinine या तपासण्या करून घ्याव्यात.

मधुमेह : जीवनशैली व आहार

३) नेत्र : नेत्रतज्ज्ञाकडे जाऊन डोळ्यांची तपासणी करून घ्यावी.

४) त्वचा : मधुमेहामध्ये त्वचेची काळजी घ्यायला हवी. जांघा, कांखा, स्तनांच्या खाली, दोन पायांच्या बोटामध्ये जंतुसंसर्ग होऊ शकतो. म्हणून या जागा स्वच्छ ठेवाव्यात तसेच पायामध्ये नेहमी मोजे घालावेत.

५) पाय : रक्तवाहिन्यांसाठी डॉपलर तपासणी करून घ्यावी.

६) मज्जातंतूसाठी : नर्व कंडक्शन टेस्ट करून घ्यावी. मधुमेह आटोक्यात आणला तर इतर सर्व आजार आपोआप आटोक्यात येतात. योग्य आहारविहाराने मधुमेह आटोक्यात येतो.

आहार योग्य वेळेत नाश्ता व जेवण करणे फार महत्त्वाचे असते. पोटभर जेवण करण्यापेक्षा थोड्या थोड्या अंतराने कमी प्रमाणात खायला हवे. फायबरयुक्त, कमी कॅलरीचा आहार हितावह ठरतो. गाजर, काकडी, टोमॅटो, कच्च्या भाज्या धोथायुक्त असतात. त्यामुळे असे पदार्थ खाल्ल्यावर पोट भरल्याचे समाधान मिळते व साखर वाढत नाही. याविरूद्ध तेल, तूप, साखर, साय, लोणी, शेंगदाणे, नारळ आणि मांसाहारातून जास्त कॅलरीज मिळतात व शरीराचील साखर वाढते.

पुढीलप्रमाणे आहार घेतला तर मधुमेही रुग्णांचे आरोग्य चांगले राहील. सकाळी ७ वाजता : १ ग्लास कोमट पाणी + १ चमचा लिंबाचा रस

सकाळी ८.३० वाजता : नाश्ता : १ कप दूध (गायीचे साय काढलेले) + १ फळ किंवा राजगिरा लाही/ज्वारी लाही – एक वाटी किंवा मोड आलेली कडधान्ये – एक वाटी किंवा मूगाडोळीचे थिरडे–२ मध्यम (तेल कमी), किंवा थालीपीठ–२ मध्यम किंवा उकडलेले अंडे २ (पिवळा भाग नको)

सकाळी ११.३०–१२ वाजता : जेवण : कोशिंबीर १ वाटी, ताक १ ग्लास, पोळी एक ते दीड, भाजी १ वाटी, डाळ १ वाटी, उसळ एक वाटी

_ रात्री ७–८ वाजता : जेवण : कोशिंबीर १ वाटी, ताक एक ग्लास, पोळी एक ते दीड किंवा भाकरी, भाजी १ वाटी, डाळ १ वाटी. (क्रमशः)

डॉ. शारदा निर्मल–महांडुळे
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर मोबाईल नं– ८७९३४००४००

'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत' अहमदनगरच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील भरती मेळाव्यात ६० जणांची निवड

नगर – मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत अहमदनगर येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या भरती मेळाव्या मध्ये एकूण २१ आस्थापना सहभागी झाल्या होत्या. १२ वी पास ते पदवीधर या विविध संवर्गातुन एकूण १६० प्रशिक्षणार्थी उमेदवारांनी आपली नोंदणी केली होती त्या पैकी थेट मुलाखतीद्वारे एकूण ६० उमेदवारांची निवड करण्यात आली. तहसीलदार संजय शिंदे व औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य खालीद जहागीरदार यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले.

अहमदनगर येथे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत मुख्य नंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत भरती मेळाव्यामध्ये निवड झालेल्या पात्र उमेदवारांना तहसीलदार संजय शिंदे व औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य खालीद जहागीरदार यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. (छाया – समीर मन्यार)

पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करुन मेळाव्याची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी तहसीलदार संजय शिंदे, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य खालीद जहागीरदार, नायब तहसीलदार अभिजीत वांदेकर, मुलभुत प्रशिक्षण तथा अनुषांगिक सुचना केंद्रचे सहायक प्रशिक्षणार्थी सल्लागार एस व्ही जाधव, कनिष्ठ प्रशिक्षणार्थी सल्लागार, पी. एस जाधव, व्ही.आर कुलापाटी, कौशल्य विकास अधिकारी प्रशांत सानप, श्मरोजगार मंत्रालय भारत सरकार चे प्रतिनिधी वसीम पठाण आदी उपस्थित होते.

यावेळी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य खालील जहागीरदार म्हणाले की मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा लाभ घेण्यासाठी उमेदवाराचे वय १८ ते ३५ या वयोगटातील असावे. प्रशिक्षणाचा कालावधी ६ महिने असेल.उमेदवार १२ वी, आय.टी. आय. / पदविका, पदवीधर / पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण असावा. उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा. उमेदवाराची आधार नोंदणी असावी.उमेदवाराचे बँक खाते आधार संलग्न असावे. उमेदवाराने रोजगार नोंदणी क्रमांक प्राप्त केलेला असावा.

३० सप्टेंबर रोजी मुख्यमंत्री कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत दुसरा भरती मेळावा आयोजित करण्यात येणार असून यामध्ये बँकिंग व वैद्यकीय क्षेत्रातील आस्थापना सहभागी होणार आहेत, तरी जास्तीत जास्त बेरोजगार उमेदवारांनी या भरती मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जहागीरदार यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती कुरापाटी यांनी केले सूत्रसंचालन जे.ई.खाकाळ यांनी केले आभार प्रतीक जाधव यांनी मानले. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या सर्व निदेशकांचे व गटनिदेशकांचे सदर कार्यक्रमास मोलाचे सहकार्य लाभले.

शैक्षणिक अर्हतानुसार दिले जाणारे प्रशिक्षण विद्यावेतन १२ वी पास रु. ६,०००/ आय.टी.आय / पदविका रु. ८,०००,पदवीधर / पदव्युत्तर रू.१०,००० ऑनलाईन पद्धतीने प्रशिक्षणार्थीचे विद्यावेतन प्रशिक्षणार्थीच्या थेट बँक खात्यात (DBT) ऑनलाईन पध्दतीने दरमहा अदा करण्यात येईल. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना संबंधित आस्थापनेकडून प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल. प्रशिक्षणार्थी म्हणून उमेदवाराला त्यांचे कौशल्य विकसित करण्याची आणि पुढे जाऊन, त्याला त्याच्या पात्रतेची आणखी चांगली नोकरी, व्यवसाय, उद्योग यांची निवड करता येणार आहे. राज्याची ही फलंगशीप योजना असुन www.mahaswayam.gov.in वेबसाईटवर उमेदवारांनी नोंदणी करावी व अधिक माहितीसाठी या कार्यालयाचा दुरध्वनी क्र. ०२४१-२९९५७३५ संपर्क साधावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले आहे.

अरणगाव येथील हर्ष कांबळेचे वैद्यकीय परिक्षेत (नीट) यश

नगर – अवतार मेहेर बाबा ट्रस्ट संस्थेच्या मेहेराबाद अरणगाव येथील मेहेर इंग्लिश स्कूलचा माजी विद्यार्थी हर्ष कांबळे याने वैद्यकीय परिक्षेत (नीट) यश प्राप्त केल्याबद्दल स्कूलच्या वतीने त्याचा सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापिका केतकी शेंदरे, व्यवस्थापिका मंजूला काला, अवतार मेहेर बाबा ट्रस्टचे विश्वस्त रमेश जंगले आदींसह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

अरणगाव येथील हर्ष कांबळे याने वैद्यकीय परीक्षेत यश प्राप्त केल्याबद्दल त्याचा मेहेर इंग्लिश स्कूलच्यावतीने सत्कार करताना अवतार मेहेरबाबा टस्टचे विश्वस्त रमेश जंगले. समवेत इतर.

मेहेर इंग्लिश स्कूलच्या माध्यमातून समाजातील गरजू मुलांना मोफत शिक्षण दिले जात आहे. अरणगाव येथील शाळेचा माजी विद्यार्थी हर्ष संजय कांबळे याने वैद्यकीय परिक्षा (नीट) २०२४ मध्ये घवघवीत यश संपादन केले आहे. त्याची मुंबई येथील एच.बी. ठाकरे मेडिकल कॉलेज मध्ये एमबीबीएस शिक्षणासाठी निवड झाली आहे.

हर्ष याचे वडील संजय कांबळे अवतार मेहेर बाबा ट्रस्ट मध्ये अनेक वर्षांपासून सेवा देत आहेत. हर्ष याने बिकट परिस्थितीवर मात करुन चांगल्या गुणांनी यश संपादन केले आहे. त्याचा मेहेर बाबांचे पुस्तक व प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला.

मेहेर इंग्लिश स्कूल सक्षम पिढी घडविण्याचे कार्य करत आहे. दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षणाने या शाळेचे विद्यार्थी विविध क्षेत्रात चमकत असल्याची भावना रमेश जंगले यांनी करुन कांबळे याला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या शाळेत शिकून मोठा झाल्याचा अभिमान आहे. शिक्षकांनी प्राथमिक शिक्षणाचा पाया मजबूत केल्याने हे यश गाठता आले. या यशात आई-वडिलांसह शिक्षकांचा मोठा वाटा असल्याचे त्यांनी सांगितले.

सर्व सामान्य कुटुंबातील मुलगा असल्याची जाणीव होती, मात्र प्रामाणिकपणे कष्टाने अभ्यास करुन हे यश मिळवल्याचे त्याने स्पष्ट केले. तर इतर विद्यार्थ्यांना मोबाईल व सोशल मीडिया पासून लांब राहण्याचे आवाहन केले.

राज्यस्तरीय नाट्यछटा स्पर्धेत राजसी भणगे हिने प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल तिचा सत्कार करताना बालरंगभूमी परिषदेचे सतीश लोटके, उर्मिला लोटके आदी.

राज्यस्तरीय नाट्यछटा स्पर्धेत राजसी भणगे प्रथम

नगर – नाट्यछटा हा कलाप्रकार तसा नाट्यक्षेत्रात अत्यंत अवघड मानला जातो परंतु शिरूर येथे झालेल्या राज्यस्तरीय नाट्यछटा स्पर्धेत २७० विद्यार्थ्यांचा सहभाग होता, विशेषतः पुणे, छत्रपती संभाजीनगर आणि अहमदनगर जिल्ह्यातील स्पर्धक यात सहभागी झाले होते.

यात नगरच्या राजसी प्रसाद भणगे हिने प्रथम क्रमांक पटकावला आणि नगरच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला. यापूर्वीही अनेक कथाकथन, नाट्यछटा तसेच बालराज्यनाट्य स्पर्धांत यश मिळविलेली राजसी हि गॅलेक्सि नॅशनल स्कूलची विद्यार्थिनी आहे.

या यशाबद्दल बालरंगभूमी परिषदेचे सतीश लोटके, उर्मिला लोटके तसेच सर्व पदाधिकारी आणि नाट्यक्षेत्रातील सर्वांनी तिचे अभिनंदन केले आहे.

फिरोदिया शिवाजीयन्स फुटबॉल स्पर्धेत आठरे पाटील, आर्मी पब्लिक व रामराव आदिक स्कूल संघ विजयी

नगर – फिरोदिया शिवाजीयन्स इंटर स्कूल फुटबॉल स्पर्धेत २५ सप्टेंबरला झालेल्या विविध वयोगटाच्या फुटबॉल सामन्यात आठरे पाटील, आर्मी पब्लिक व रामराव आदिक स्कूल संघांनी विजय मिळवला. सर्व सामन्यांमध्ये प्रतिस्पर्धी संघांना एकही गोल करता आला नही. दुपारच्या सत्रानंतर रिमझिम पाऊसात फुटबॉलचे सामने रंगले होते.

ही स्पर्धा अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर सुरु आहे. १२ वर्ष वयोगटात श्री साई स्कूलच्या संघाने सीआरएस पूर्लता न केल्यामुळे त्यांचा सामना होऊ शकला नही. पोदार स्कूल विरुध्द आठरे पाटील स्कूल मध्ये झालेल्या सामन्यात ०–६ गोलने आठरे पाटील स्कूलच्या संघाने एकतर्फी विजय मिळवला. सन्यक म्हस्के याने सर्वाधिक ४ गोल करुन विजय निश्चित केला. तर ओम गलांडे व मानस भोसले यांनी प्रत्येकी १ गोल केला.

फिरोदिया शिवाजीयन्स इंटर स्कूल फुटबॉल स्पर्धेत १४ वर्ष वयोगटात आर्मी पब्लिक स्कूल (एसीसी अंण्ड एस) विरुध्द डॉन बॉस्को यांच्यात रंगलेला सामना. यामध्ये आर्मी पब्लिक स्कूलने ५–० गोलने विजय मिळवला.

१४ वर्ष वयोगटात आर्मी पब्लिक स्कूल (एसीसी अंण्ड एस) विरुध्द डॉन बॉस्को यांच्यात झालेल्या सामन्यात आर्मी पब्लिक स्कूलने ५–० गोलने दणदणीत विजय मिळवला. पावसाच्या रिमझिम सरीत आर्मी पब्लिक स्कूलच्या खेळाडूंनी आक्रमक खेळी करुन आदर्श साबळे ३, प्रतिक शेळके व विवेंद्र वीर याने प्रत्येकी १ गोल करुन संघाला विजय मिळवून दिला.

१६ वर्ष वयोगटात कर्नल परब स्कूल विरुध्द रामराव आदिक स्कूल मधील सामन्यात रामराव आदिक स्कूलने उत्कृष्ट खेळ करुन तब्बल ७ गोल केले. यामध्ये अनिल भोय व ललित गागडे यांनी प्रत्येकी ३ व रवी गायवकाड याने १ गोल केला. ०–७ गोलने रामराव आदिक स्कूलचा संघ विजयी झाला.

आर्मी पब्लिक स्कूल विरुध्द रामराव आदिक स्कूल मध्ये सामना रंगतदार झाला. या अटीतटीच्या सामन्यात आर्मी पब्लिक स्कूल कडून अमित पांडे व वेदांत शेंडगे यांनी प्रत्येकी १ गोल करुन २–० गोलने विजय मिळवला.

राष्ट्रीय सेवा योजनेविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. सीताराम काकडे. व्यासपीठावर प्राध्यापक वर्ग. दुसऱ्या छायाचित्रात उपस्थित असलेले विद्यार्थी–विद्यार्थिनी.

विद्यार्थ्यांनी सकारात्मक व विज्ञानवादी दृष्टीकोन ठेऊन काम केले पाहिजे

प्रा. सीताराम काकडे यांचे प्रतिपादन

नगर – राष्ट्रीय सेवा योजनेतून विद्यार्थ्यांना स्वतःची जडणघडण करत असताना समाजप्रती आपली जबाबदारी, जागिवा जोपासण्याचे आवाहन प्रा. सीताराम काकडे यांनी केले. तुमच्यामधूनच देशाची भावी पिढी आकारला येत आहे म्हणून आपण कसलाही न्यूनगंड न बाळगता सकारात्मक व विज्ञानवादी दृष्टीकोन ठेऊन काम केले पाहिजे. स्वतःच्या विकासाबरोबरच देशाच्या विकासासाठी, कल्याणासाठी प्रयत्न केले पाहिजेत. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेत विद्यार्थ्यांचा परिपूर्ण व्यक्तिमत्व विकास कसा होतो याचे सोदाहरण सखोल मार्गदर्शन प्रा. काकडे यांनी केले.

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे रेसिडेन्शिअल कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिवस साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य विजयकुमार पोकळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास साहित्यिक व राष्ट्रीय सेवा योजनेचे उत्कृष्ट स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी म्हणून ज्यांनी पूर्वी योगदान दिलेले आहे, असे व्याख्याते व कवी प्रा.सिताराम काकडे हे प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका वैशाली दाय्कुंडे, प्रा. मोहन कांजवणे, कार्यक्रमाधिकारी प्रा.जालिंदर पिंपळे, कार्यक्रमाधिकारी दिपक जाधव, डॉ. म्हातारदेव म्हस्के आदिंसह राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक युवक–युवती उपस्थित होते.

प्रा.दीपक जाधव यांनी आभार मानले.

भारतरत्न स्वरसाम्राज्ञी लता मंगेशकरांच्या जन्मदिनी स्वरांजली कार्यक्रमाचे आयोजन

नगर – श्री गुरुमाऊली संगीत विद्यालयाच्या संचालिका सौ. वर्षा चंद्रकांत पंडित यांनी केले. त्याचप्रमाणे ह्या कार्यक्रमात अहमदनगरमधील संगीत क्षेत्रातील महत्वपूर्ण योगदान देणाऱ्या थोर विदुर्षांचा सन्मान करण्यात येणार आहे. यात संगीत तज्ञ श्रीमती आशाताई दत्तात्रय देशपांडे, गीतकार व नाट्य लेखिका सौ. मंगल प्रमोद पाठक आणि नगरमधील पहिल्या सतार वादिका सौ. स्मिता राणा यांना त्यांच्या क्षेत्रातील अतुलनीय कामगिरी बद्दल सन्मानित केले जाणार आहे, अशी माहिती चंद्रकांत पंडित यांनी दिली.

हा कार्यक्रम २८ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६–३० वाजता माऊली सभागृह, सावेडी येथे होणार असून तो सर्वांसाठी विनामूल्य आहे. नगरकर रसिकांनी उपस्थित राहून लतादीदींना आदरांजली अर्पण करावी, असे आवाहन सौ. वर्षा पंडित यांनी केले आहे.

सावेडीतील श्री समर्थ विद्या मंदिर (माध्य.) प्रशालेत हिंदी दिवसप्रसंगी सीताराम सारडा विद्यालयाचे हिंदी भाषेचे शिक्षक रविंद्र चोभे मार्गदशन केले. समवेत प्रशालेच्या प्राचार्या तथा मुख्याध्यापिका श्रीमती संगिता जोशी, पर्यवेक्षक सुनिल कानडे आदी. (छाया – उदय जोशी)

हिंदी एक मधुर भाषा

शिक्षक रविंद्र चोभे यांचे प्रतिपादन; सावेडीतील श्री समर्थ विद्या मंदिर (माध्य.) प्रशालेत हिंदी दिवस साजरा

नगर – हिंदी राष्ट्रभाषा कधीच मरू शकत नाही, ती आपल्या व्यवहारात बोलली जाते भारतात सैनिक हिंदी भाषा बोलतात. भारतातील सर्व राज्यांमध्ये हिंदी भाषा बोलली जाते, हिंदी एक मधुर भाषा आहे हिंदी का सन्मान वाढवा भाषा हा विचार व्यक्त करण्याचे माध्यम आहे, असे प्रतिपादन सीताराम सारडा विद्यालय हिंदी भाषेचे शिक्षक रविंद्र चोभे यांनी केले.

सावेडीतील श्री समर्थ विद्या मंदिर (माध्य.) प्रशालेत हिंदी दिवस साजरा करण्यात आला. शिक्षक रविंद्र चोभे हे प्रमुख पाहुणे होते. प्रशालेच्या प्राचार्या तथा मुख्याध्यापिका श्रीमती संगिता जोशी, पर्यवेक्षक सुनिल कानडे आदी उपस्थित होते.

रविंद्र चोभे यांनी हिंदी राष्ट्रीय भाषा का महत्व सांगितले.मुख्याध्यापिका यांनी प्रास्ताविकात हिंदी दिवसाचे महत्व सांगितले. कु. रेणुका कुलकर्णी या विद्यार्थीनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

इ. ७ वीतील विद्यार्थ्यांनी विविध कार्यक्रम सादर केले. कविता, गीत गायन, कु. रिद्धी खेडकर या विदयार्थीने भाषण केले. कु. मार्गिवे मेने या विद्यार्थीने हिंदी की उत्पत्ती या विषयी माहिती दिली. वर्णमाला या विषयावर नाटिका सादर केली. विद्यार्थ्यांनी हिंदी बीमार हैं या विषयावर नाटक सादर केले.

सुरुवातीला प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. प्रमुख पाहुणे सीताराम सारडा विद्यालय हिंदी भाषा व्याख्याते रविंद्र चोभे हे होते. श्रीमती शशीरेखा नारळे, सौ. किर्ती वाघमारे, कु. स्वाती घुल, सौ. स्वप्ना कलवडे हे शिक्षक उपस्थित होते. सूत्रसंचालन विदयार्थी चि. पार्थ जरे यांनी केले. आभार कु. अनुष्का जावळे हिने मानले. शेवटी हिंदी पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

महावीर स्वामींची अहिंसा, जीवदयेची शिकवण आजच्या काळाची गरज

जिल्हाधिकारी सिद्धराम सालीमठ यांचे प्रतिपादन; भगवान महावीर स्वामी निर्वाण कल्याणक वर्षानिमित्त आयोजित निबंध स्पर्धेच्या नियोजनासाठी जिल्हा समितीची सम्नवय बैठक

नगर – महान व्यक्तीमत्वांचे विचार आणि शिकवण समाजाला दिशा देत असते. भगवान महावीर स्वामी यांनी २५०० वर्षपूर्वी दिलेले शांती, अहिंसा, जीवदया, आणि जियो और जिने दो ही शिकवण आजच्या काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांमध्ये हे विचार रूजल्यास खऱ्या अर्थाने आनंदी समाजाची निर्मिती होईल. भगवान महावीर यांच्या २५५० निर्वाण कल्याणक वर्षानिमित्त निमित्त शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित निबंध स्पर्धेमुळे मुलांना दिशा देणारी शिकवण मिळेल. त्यामुळे या स्पर्धेसाठी जिल्हास्तरीय समितीला सर्वतोपरी सहकार्य करुन महाराष्ट्रातील जास्तीत जास्त विद्यार्थी नगर जिल्ह्यातून या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रयत्न करू व समितीस सहकार्य करू, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी सिद्धराम सालीमठ यांनी केले.

भगवान महावीर स्वामी यांच्या २५५० व्या निर्वाण कल्याणक निमित्त महाराष्ट्र शासनाने कौशल्य, रोजगार, उद्योजकता, नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय कार्यक्रम समिती स्थापन केली आहे. समितीमार्फत विविध सांस्कृतिक कार्यक्रम, व्याख्यानमाला, इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतच्या सर्वधर्मीय विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. कार्यक्रमांच्या नियोजनासाठी जिल्हास्तरावर समिती स्थापन करण्यात आली आहे. निबंध स्पर्धेची प्रभावी जागृती होण्यासाठी नगर जिल्हा समिती व जिल्हा प्रशासनाची संयुक्त बैठक जिल्हाधिकारी सिद्धराम सालीमठ यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात झाली. या बैठकीस जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी अशोक कडूस, उपशिक्षणाधिकारी आकाश दरेकर, दराडे सर, तसेच जिल्हा समितीचे मुख्य समन्वयक तथा जैन मंदिरचे अध्यक्ष सुभाष मुथा, सदस्य योगेश मुथा, सुदर्शन डुंगरवाल, महावीर बडजाते,

भगवान महावीर स्वामी निर्वाण कल्याणक वर्षानिमित्त आयोजित निबंध स्पर्धा समन्वय नियोजन समन्वय बैठकप्रसंगी राज्याचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांना पुस्तक भेट देताना सुभाष मुथा. समवेत जिल्हाधिकारी सिद्धराम सालीमठ

योगेश कटारिया (लोणी) आदी उपस्थित होते.

समिती सदस्यांनी अप्पर व निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पाटील यांचीही भेट घेऊन निबंध स्पर्धेचे नियोजन, शाळांमधील व्यापक जागृती आणि जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा सहभाग यादूष्टीने चर्चा केली. श्री.पाटील यांनीही या उपक्रमासाठी पूर्ण सहकार्य करण्याची ग्वाही देऊन मौल्वयान सूचना व मार्गदर्शन केले.

बैठकीत बोलताना सुभाष मुथा म्हणाले, भगवान महावीर स्वामी यांचे तत्वज्ञान, शिकवण समाजात रूजण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम, सर्व धर्मिय विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. सध्या मुलं, तरुण पिढी चुकीच्या गोष्टींच्या आहारी जात आहे. व्यसनाधीनता वाढत आहे. या पिढीला चांगले विचार आणि संस्कारांची गरज आहे. या निबंध स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना चांगले विचार मिळून त्यांचे आचरण चांगले होण्यास नक्कीच मदत होईल. इयत्ता ५ वी ते ७ वी आणि इयत्ता ८ वी ते १० वी अशा दोन गटात स्पर्धा होणार आहे. भगवान महावीर स्वामी यांचे जीवन सिध्दांत, शिकवण, संदेश आणि जीवन चरित्र या विषयावर निबंध सादर करायचे आहेत. ३० सप्टेंबर पर्यंत विद्यार्थ्यांनी आपले सुवाच्य हस्ताक्षरात लिहिलेले निबंध आपापल्या शाळेत जमा करायचे आहेत. राज्यस्तरावर निबंध स्पर्धेत प्रत्येकी २ विजेते निवडले जातील. यात प्वी ते ७ वी गटात प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या स्पर्धकास ३ लाख ३३ हजार ३३३ रूपये, द्वितीय क्रमांकास २ लाख २२ हजार २२२ तर तृतीय क्रमांकास १ लाख ११ हजार १११ रुपये बक्षीस तर ८ वी ते १० वी गटात प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या स्पर्धकास ४ लाख ४४ हजार ४४४ रूपये, द्वितीय क्रमांकास २ लाख २२ हजार २२२ तर तृतीय क्रमांकास १ लाख ११ हजार १११ रुपये बक्षीस दिले जाणार आहे. जिल्हास्तरावर दोन्ही गटात प्रत्येकी दोन अशी प्रथम ५ बक्षीसे देयात येणार आहेत. एकूण ७८ बक्षीसे दिली जाणार आहेत. प्रथम क्रमांकास ५ हजार ५५५ रुपये, द्वितीय क्रमांकास ३ हजार ३३३ रुपये, तृतीय क्रमांकास २ हजार २२२ रुपये, चतुर्थ क्रमांकास १ हजार १११ रुपये, पाचव्या क्रमांकास ५५५ रुपये बक्षीस दिले जाणार आहे.

स्पर्धकांनी मराठी, हिंदी अथवा इंग्रजी भाषेत निबंध लेखन करायचे आहे. मंत्री मंगलप्रभात लोढा, ललित गांधी, संदीप भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा समितीने संपूर्ण स्पर्धेचे नियोजन केले आहे. जिल्हाधिकारी सिद्धराम सालीमठ यांच्या व शिक्षण विभाग, मनपा प्रशासन यांच्या सहकार्याने नगर जिल्हातून सर्वाधिक संख्येने निबंध येतील असा विश्वास आहे.

यावेळी शिक्षणाधिकारी अशोक कडूस म्हणाले, शिक्षण विभगामार्फत सर्व शाळांना सूचना देण्यात आल्या आहेत. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभागी होण्यासाठी शाळांनी प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न करावेत अशा सूचना दिल्या असून संपूर्ण उपक्रमाचाही आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याची ग्वाही त्यांनी दिली. यावेळी झालेल्या चर्चेत समिती सदस्य सुदर्शन डुंगरवाल, योगेश मुथा, महावीर बडजाते यांनी सहभाग घेतला.

कष्टाचे फळ नेहमी मिळतातच : खा. निलेश लंके

नगर – कोणताही व्यवसाय असो त्यासाठी सातत्य व कष्टाची अत्यंत आवश्यकता आहे. मन लावून कष्ट केल्यास यश नक्कीच प्राप्त होते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे नाज कलेक्शन आहे. त्यांनी छोटाशा दुकानातून सुरू केलेला व्यवसाय आज त्यांच्या कष्टामुळे जिल्ह्यात नावाजलेला एकमेव दुकान झालेला असल्याचे प्रतिपादन खा. निलेश लंके यांनी केले.

तख्तीदरवाजा येथील नाज कलेक्शनच्या दालनाचा नुतनीकरण करताना श्रीमती मालिमाही सय्यद व खा. निलेश लंके. समवेत इतर प्रमुख पाहुणे.

इस्लामी भेटवस्तूचे अहमदनगरमधील एकमेव नाज कलेक्शनचे उद्घाटन

तख्तीदरवाजा येथील नाज कलेक्शन दालनाचे नुतनीकरण आई साहेब श्रीमती सलिमाही सय्यद यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून खा. निलेश लंके बोलत होते.

यावेळी माजी महापौर भगवान फुलसौंदर, बाळासाहेब बोराटे, हाजी कलीम इस्तेकारी, हाजी शौकत तांबोली, सैय्यद खलील, शिवसेनेचे प्रकाश राठोड, अशोक कानडे, अलाउद्दीन काझी, डॉ. इस्लाम शेख, हाजी फारूक कमाल, भरत सूपेकर, शाहनवाज खान, डॉ. परवेज अशरफी, हाजी लियाकत हुसैन नजर हुसैन, सलिम खान गुलाब खान, पवन फिरोदिया, पवन श्रीकांत नाईक, राजु जाहगीरदार (खादीम मिराखली बाबा पहाड़), अनंतराव गारदे, सय्यद अजहर, अब्दुल कादिर शेख, कासिम शेख, मोहम्मद हुसैन शेख, गुलाम मोहम्मद, अजंर अनवर खान, अजिम राजे, नदीम शेख आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना खा. निलेश लंके म्हणाले की आज धार्मिक स्थळांना लोक मोठ्या प्रमाणात भेटी देत असतात व तेथून आपल्या मित्र मंडळांना भेट देण्यासाठी भेटवस्तू आणत असतात. पण साधारण सर्वांना ते देऊ शकत नाही अशावेळी नाज कलेक्शनने सर्वसामान्य लोकांसाठी त्या भेटवस्तू आपल्या दालनात उपलब्ध करुन दिले आहे ही मोठी बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. या गोष्टीचा सर्वसाधारण लोकांना नक्कीच फायदा होईल असे त्यांनी सांगितले.

संचालक सय्यद अंन्सार मोहम्मद शफी कादरी, सय्यद मुस्तफा अंन्सार, सय्यद अहमद अंन्सार, सय्यद अली अंन्सार आदिंनी स्वागत केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शेख नासिर हाजी हाफीजुद्दीन, सैय्यद इब्राहिम, शरीफ खान, सकलैन रिजवान, सैय्यद असीम सादीक, समीर इब्राहिम शेख, अमजद शेख, अरबाज पठाण, बासीत शेख, फैरोज शेख दौंडवाले, परवेज शेख, रिजवान दिलावर खान आदिंनी परिश्रम घेतले.

आर्थिक स्वावलंबन पाहिजे? मग परिणामकारक ॲसेट ॲलोकेशन करा.

आर्थिक स्वातंत्र्य मिळविणे हे ध्येय साध्य करण्यासाठी अनेकांची इच्छा असते, परंतु शिष्यवर्ग पोहोचायचे झाले तर केळकर पिगळदरे बचत वाचले पिंचा सर्वात लोकप्रीय शेअर निवडी यापेक्षा बरेच काही साध्यता असते. मालमत्ता वितरण (ॲसेट ॲलोकेशन) हे सर्वात समर्थवॉन मात्र बहुतांशी दुर्लक्षित नीतीपैकी एक असते. सोप्या भाषेत सांगायचे तर, आपली आर्थिक उद्दीष्ट आणि जोखमीच्या क्षमतेनुसार जोखीम आणि पुरस्कार यांमध्ये संतुलन साधण्यासाठी इक्विटी, सोने, रिअल इस्टेट, सोने आणि रोख यांसारख्या विविध मालमत्ता वर्गांच्या आपली गुंतवणूक पसरविण्याची कला म्हणजे मालमत्ता वितरण.

राजन कुटे

वैविध्य हाच गाभा

वैविध्य ही परिणामकारक मालमत्ता वितरणाची मुलभिक्षी आहे. एकमेकांच्या संपत्तीचे भदलत न जाणारा विविध मालमत्तांमध्ये गुंतवणूक करून आपण आपल्या पोर्टफोलिओचे बाजारातील अस्थिरतेपासून संरक्षण करता. उदाहरणार्थ, जेव्हा शेअर्सची कामगिरी अपेक्षेनुसार होत नाही, तेव्हा रोखे किंवा इतर सुरक्षित गुंतवणूकीवर लिक्विडा देऊन सावरे. या संतुलित इक्विटीगुंतवणूक गंदीच्या काळात कमीत कमी नुकसान होते आणि अचूकपणे परिस्थितीत आपल्या पोर्टफोलिओला मदतीसाठी तयार देतो.

कष्टसाध्यतेकडून ही गुरुगिरीकडे

मालमत्ता वितरण ही सर्वांसाठी एकच एक अशी सरसोपट रनगीती नाही. आपली वैद्यकिक उद्दीष्ट, कालमर्यादा आणि जोखीम घेण्याच्या क्षमतेवरुन ती अवलंबी पाहिजे. दीर्घकाळ हयातीत असलेल्या तरुण गुंतवणूकदारांसाठी, इक्विटीवर गोष्टा प्रमाणात भर दिलेल्या अधिक आक्रमक वितरणामुळे वाढीची लक्षणीय क्षमता निर्माण झाली. याउलट, निवृत्तीच्या उंबरठ्यावर असलेल्या व्यक्ती आपले भांडवल टिकवून ठेवण्यासाठी रोखे आणि इतर कमी जोखमीच्या गुंतवणूकीकडे वळूत पारंपरिक विभागाला प्राधान्य देऊ शकतात.

नेहमी सतर्क राहा

आर्थिक स्वावलंबन प्राप्त करण्यासाठी आपल्या पोर्टफोलिओचे नियमित पुनरावलोकन आणि पुरस्कृतन करणे देखील आवश्यक असते. बाजारातील हलचालींमुळे आपले मालमत्ता वितरण बदलू शकते. त्यामुळे आपल्याला अनपेक्षित जोखमींचा सामना करावा लागण्याची शक्यता असते.

वेळोवेळी पुनर्संतुलन केले तर आपण पोर्टफोलिओची आपल्या उद्दीष्टांशी सुसंगत रचना जतन करतात.

परिणामकारक मालमत्ता वितरणामुळे जोखमीचा व्यवस्थापन चतुराईने करून आर्थिक स्वातंत्र्याचा स्थिर मार्ग लाभतो. अनावश्यक धोके न पकत्ता आपले पैसे काटेकोर काम करतील, याची हमी त्यामुळे मिळते. आपल्या गुंतवणुकीचा प्रवास सुरू करा असाल किंवा आपला पूर्णपणे अचिक उत्तम करत असाल, विरुध्यासी आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त करायचे असेल तर मालमत्ता वितरणाकडे लक्ष केंद्रीत करणे हे महत्त्वाचे ठरेल.

मुंडवा भिनसर्डचे राजन कुटे म्हणाले की, राष्ट्रीय गुंतवणूकदारच्या दृष्टीने मालमत्ता वितरण करणे हे श्रीमंतपाठचे सोपे नसते. याचाही आयसीआरसीआय म्रुडेक्सियल ॲसेट ॲलोकेटर फंड (एफआयए) सारख्या ॲसेट ॲलोकेटर म्युचुअल फंडात गुंतवणूक करणे हा एक सोपा पर्याय असतो. हा फंड स्वतः बनविलेल्या प्रायुक्तांने इक्विटी, डेट आणि गोल्ड म्युचुअल फंड गोठवा/ इंटीएफ मध्ये स्वतः बनविलेल्या व्हॅल्युएशन मॉडेलवर आधारित गुंतवणूक करतो. या फंडाने ३० ऑगस्ट २०२४ पर्यंत एक वर्षाच्या दमदार २२.२८% परतावा दिला आहे. तसेच ३ वर्षांचा सीएजीआर ५४.०२% आणि ५ वर्षांचा सीएजीआर १५.२१% दिला आहे.

बाई इचरजबाई फिरोदिया स्मरणार्थ आंतरशालेय स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुण्या प्रा. अमृता रत्नपरखी. समवेत संस्थेच्या पदाधिकारी, शिक्षक, पालक, विद्यार्थी.

बाई इचरजबाई फिरोदिया स्मरणार्थ आंतरशालेय स्पर्धेचे उद्घाटन

नगर – अ.ए.सो.वी बाई इचरजबाई फिरोदिया प्रशालेच्या वतीने दरवर्षी शहर स्तरावरील आंतरशालेय स्पर्धांचे उद्घाटन झाले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. अमृता रत्नपरखी तर अ.ए.सो.वी विश्वस्त मंडळाचे सदस्य ज्येष्ठ विधीज्ञ गौरव मिरीकर, अ.ए.सो.वी सह्याद्रीर समिती सदस्य भूषण भंडारी, मुख्याध्यापिका विद्या गांगर्डे, मुख्याध्यापिका उज्वला कळमकर, शिक्षक, पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

स्पर्धा २७ सप्टेंबरपर्यंत बाई इचरजबाई फिरोदिया प्रशालेत होणार आहेत. यामध्ये कथाकथन, गायन, चित्रकला, फॅन्सी ड्रेस, नृत्य, रांगोळी स्पर्धा होणार आहेत. स्पर्धेत १६ शाळांमधील ४८० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया सर्व संस्था पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्राशालेच मुख्याध्यापिका ज्योती सिसोदिया यांच्या नियोजनात स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

यावर्षी स्पर्धांचे परीक्षण करण्यासाठी अमृता बेडेकर, एडके श्रावणी, माधुरी गोडे, उषा सारसर, प्रिया जोशी, प्रकाश शिंदे, लक्ष्मीकांत देशमुख हे उपस्थित होते.

सूत्रसंचालन पराग विलायते तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय वैभव वाघ यांनी करुन दिला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रशालेच्या मुख्याध्यापिका ज्योती सिसोदिया यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

शहरात युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना बळ देण्याचे काम केले जाणार

एहसान अहमद खान यांचे प्रतिपादन

नगर – शहरात युवक काँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना बळ देण्याचे काम वरिष्ठ नेते करणार आहेत. मुन्ताभाया भीतीपोटी युवक भाजपची विचारधारा स्वीकारणार नाही. भाजपने मांडलेल्या नफरतच्या बाजारात काँग्रेसची मोहब्बतची दुकान भरी पडत असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र युवक प्रभारी एहसान अहमद खान यांनी केले.

युवक काँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या संमेलनामध्ये बोलताना एहसान अहमद खान. समवेत व्यासपीठावर इतर पदाधिकारी.

युवा संमेलनात मोसिम शेख यांना उमेदवारी देण्याची युवकांची मागणी

शहरातील रहेमत सुलतान सभागृहात युवक काँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे संमेलन पार पडले. या संमेलनात युवकांना संबोधित करताना श्री. खान बोलत होते. याप्रसंगी युवक प्रदेश उपाध्यक्ष प्रशांत ओगले, अल्पसंख्यांकचे प्रदेश सचिव निजाम जहागीरदार, शहर जिल्हा युवक अध्यक्ष मोसिम शेख, जिल्हा चिटणीस श्यामराव वामस्कर, शहर जिल्हा उपाध्यक्ष खलील सय्यद, राजू शेख, तालुका अध्यक्ष बाबा जाधव, अल्पसंख्यांक शहर जिल्हाध्यक्ष अकदस शेख, सोशल मीडिया उत्तर महाराष्ट्र समन्वयक साजर इरमल, सामाजिक न्याय विभाग शहराध्यक्ष अक्षय गायकवाड, अल्पसंख्यांक उपाध्यक्ष तौफिक शेख, रिजवान शेख, अभिजीत कांबळे, नवाज शेख, निजाम पठाण, संजय झोडगे, अशोक भिंगारदिवे आदींसह युवक सहभागी झाले होते.

पुढे श्री. खान म्हणाले की, युवकांनी शहरात काँग्रेसची विचारधारा जिवंत ठेवली. विधानसभेमध्ये युवक उमेदवार देण्यासाठी पक्ष श्रेष्ठींकडे प्रस्ताव मांडणार असल्याचा विश्वास त्यांनी दिला. २०१४ पासून मोदींच्या नेतृत्वाखाली सत्तेत आलेले भाजप सरकार देशात असंवेधानिक कार्य करुन समाजात व जाती–धर्मात एकमेकांना लढविण्याचे कार्य करत असल्याचा आरोप त्यांनी केला. भाजप विरोधात भूमिका घेणाऱ्या युवकांना गुन्हात अडकवण्याचे काम केले जात आहे. काँग्रेस सत्तेत आल्यानंतर त्यांच्यावरील खोटे गुन्हे मागे घेण्याचे कामही करणार असल्याचा विश्वास त्यांनी दिला.

या युवा संमेलनात युवकांनी विविध समस्या मांडून काँग्रेसमध्ये काम करताना वरिष्ठांकडून पाठबळ दिले जात नसल्याची खंत व्यक्त केली. तर विधानसभेसाठी शहरची जागा घेऊन मोसिम शेख वामस्कर यांनी शहरातील विविध प्रश्न मांडले.

खलील सय्यद यांनी युवकांच्या माध्यमातून शहरात बदल घडणार आहे. युवकांच्या ध्येय बदल घडविण्याची शक्ती असून, युवकांनी एकजुटीने पुढे येण्याचे शशिकांत.

प्रशांत ओगले म्हणाले की, निवडणुकीचा स्टंट म्हणून हिंदू–मुस्लिम समाजात भांडणे लावण्याचे काम भाजप करत आहे. हे काम करणाऱ्या नेत्यांना उमेदवारी व बळ देण्याचे काम केले जात आहे. काँग्रेस सर्व जाती–धर्माला बरोबर घेऊन कार्य करत आहे. भाजपचे विचार धर्मांतलेला प्रोत्साहन देणारे असून, नागरिकांना देखील याची जाणीव झाल्याने सत्तापरिवर्तनाची चाहूल लागल्याने त्यांनी जाती–धर्माच्या नावावर भांडणे लावण्याचा काम सुरु केले असल्याचा आरोप त्यांनी केला.

यावेळी बाबा जाधव यांची युवक तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करुन त्यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन निजाम जहागीरदार यांनी केले. आभार मोसिम शेख यांनी मानले.

अहमदनगर जिल्हा बँक्स् असोसिएशनचा २९ सप्टेंबर रोजी शिर्डी येथे पुरस्कार सोहळा

नगर – अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी बँकांनी केलेल्या कार्याची दखल व त्यांनी केलेल्या कार्याला प्रोत्साहन म्हणून अहमदनगर जिल्हा बँक असोसिएशन दरवर्षी उत्कृष्ट कार्य केलेल्या नागरी सहकारी बँकांचा गौरव, पुरस्कार देऊन करत असते. यावर्षी पुरस्कार सोहळा २९ सप्टेंबर रोजी साई तीर्थ थीम पार्क, शिर्डी येथे आयोजित केलेले आहे.

पुरस्कार वितरण सोहळा मालपाणी उद्योग समूहाचे संचालक राजेश मालपाणी असोसिएशनचे चेअरमन सत्येन मुंदडा, व्हाईस चेअरमन शिवाजी व्यवहारे तसेच असोसिएशनचे माजी चेअरमन गिरीश घैसास यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे.

या पुरस्कारासाठी दोन प्रकारची वर्गवारी केलेली आहे. व्यवसाय वाढ व योग्य एनपीएचे व्यवस्थापन करणाऱ्या बँकांना ' बिंग्स अवॉर्डने' सन्मानित करण्यात येणार आहे. व विविध बँकिंग प्रशिक्षणात सहभागी होणाऱ्या बँकांना 'ब्लिट्स अवॉर्ड' ने सन्मानित करण्यात येणार आहे.

या पुरस्कार सोहळ्यास अहमदनगर जिल्हा व परिसरातील ३६ बँकांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहे.

नागरी सहकारी बँकांमध्ये या सोहळ्या बाबत विशेष उत्सुकता असते.

कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार
अहमदनगर यांचे कार्यालय, अहमदनगर

ई–मेल ॲड्रेस:- nagartahildar@gmail.com दूरध्वनी क्रमांक:- २४१६–२४१६६०
क्र. कार्वि/ Mag–2/४८३/२०२४ अहमदनगर दि. २५/०९/२०२४

जाहीर नोटीस

संदिप दादाराहेब काळे
नेहेमी, ता. जि. अहमदनगर } साठी
विरुद्ध
प्रामाणिक, निवेदक जन/गुलु } प्रतिवादी
प्रामाणिकपान, नेहेमी, ता. जि. अहमदनगर

जाहाणी अर्जदार यांनी सादरचा अर्ज जन्म/मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६१ चे कलम १४(३) अन्वये मा. राहाणिकारा अहमदनगर यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार संदिप दादाराहेब काळे यांचे वडील गणे दादाराहेब बाबुराव काळे यांची दि. ०३/०६/१९५९ रोजी जन्म/मृत्यू झालेल आहे. तसेच जन्म/मृत्यूची नोंद प्रविष्टी यांचेकडे होऊन तसा जन्म/मृत्यू प्रमाणपत्र निकालेलेचा सादरचा अर्ज मा.न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी अर्जदार संदिप दादाराहेब काळे यांची वडील यांची दादाराहेब बाबुराव काळे यांचा जन्म/मृत्यू झालेल नाही. असे जर कोणाचे म्हणणे असल्यास त्यांनी या जाहीर नोटीस प्रसिध्दीच निनांकापासून १५ दिवसांचे आत आपली लेखी हरकत कायदाचा पुरावाणिनी मा. राहणिकारा अहमदनगर यांचे कार्यालयात कळवावयास. मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास सदर कार्यालय अर्जदाराचा पुरावा घेवून सर वस्तुह अर्जदार संदाचा अर्जाचा अनुषंगाने गणे दादाराहेब बाबुराव काळे यांचे जन्म/मृत्यूची नोंद प्रविष्टी यांचाकडे घेऊन तसा दाखला अर्जदार यांना देण्याचा हुकूम करतील. मग कोणाचेही कोणताही प्रकारची सहकार मुद्दीत सध्ही लागत नाही.

नेमेकमाने आज दि. १९/०९/२०२४ रोजी जाहीर नोटीस काल रोजी माझी सही व शिक्याचिनी दिली असे.

तहसीलदार अहमदनगर करिता

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकत विक्रीचा व्यवहार आमचे असिलांबरोबर उरलेला आहे सदर मिळकतीवर आय. सी. आय. होम फायनान्स या संस्थेचा बोजा असून, या व्यतिरिक्त इतर कोणत्याही बँकेचे अथवा वित्तीय संस्थेचे कर्ज नाही असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीवासत कोणताही बाधा अथवा असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अथवा जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मयत इसमाचे वारसा हक्क, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून १० दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जागीच्यूहीक सोडून दिले आहे असे समजून आमचे असिल खरेदीचा व्यवहार पुरा करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.
हि नोटीस प्रसिध्दीस दिली. दा. २५/०९/२०२४

परिशिष्ट मिळकतीचे वर्णन

मिळकत वर्णन : जिल्हा अहमदनगर, पोतुकडी नगरपंचेकी, **महानगरपालिका हद्दीतील मौजे साडेकी येथील सर्व्ह ये - डॉसिंग स्किम मधील खालील वर्णनची प्लॉटलेखु बांधकाम मिळकत–**

सर्व्हे नंबर	प्लॉट नंबर	क्षेत्रफळ
२५७/१/२	१६ ते २१/४	६७.५० चौ.मी.

हा संपूर्ण प्लॉट व त्यावरील अन. सी. सी. मधील ग्राऊंड फ्लोअरचे बांधकाम क्षेत्र ३३.६९ चौ.मी. + फर्स्ट फ्लोअरचे बांधकाम क्षेत्र १७.२६ चौमी असे एकूण बांधकाम क्षेत्र ५०.९५ चौमी याचा रो–हाऊस नंबर ४ असा आहे.
यांशी संबंधीत–

पूर्वेस	:	प्लॉट नंबर १४
दक्षिणेश	:	प्लॉट नंबर १६ ते २१/३
पश्चिमेस	:	६.०० मीटर रुंदीचा रस्ता
उत्तरेस	:	प्लॉट नंबर १६ ते २१/५

सदर मिळकतीचे विद्यमान मालक–
श्री शहाजी धवल शेंगरा
रा. कॉटेज कॉर्नर, सावेडी, अहमदनगर.

ॲड.आर.टी.शर्मा
फोन नं. २३४१९०६, मो.नं. ९४२२२२०८४५
ऑफीस नं. १४,७०, पहिला मजला श्री आनंद कॉम्प्लेक्स, दाळमंडई, अहमदनगर

रामकृष्ण अर्बन सहकारी क्रेडिट सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत

सभासदांना १५ टक्के लाभांश वाटप, मुख्य शाखेचे नूतनीकरण करणार : चेअरमन गोपाल मणियार

नगर – पारदर्शी कारभारामुळे रामकृष्ण अर्बनचा महाराष्ट्रात नवलौकिक आहे. संस्थेस ऑडिट अ वर्ग मिळालेला आहे. रामकृष्ण क्रेडिट अर्बन चे सभासद, खातेदार, ठेवीदार, हितचिंतक आणि सर्व तत्कालीन व विद्यमान संचालक यांनी दाखविलेल्या विश्वासामुळे बँक प्रगतीपथावर आहे. सन २०२३–२४ या आर्थिक वर्षात बँकेला ३ कोटी १५ लाख इतका निव्वळ झाला आहे. संस्थेचे अधिकृत भाग भांडवल चार कोटी रुपये इतके आहे. गतवर्षी संस्थेच्या ठेवी ७९ कोटी २६ लाख इतक्या होत्या. अहवाल सालात २ कोटी ८४ लाख इतकी वाढ होऊन, वर्ष अखेरीस ८२ कोटी १० लाख इतक्या ठेवी जमा झाल्या आहेत. सर्वच्या सहकार्याने बँकेची प्रगतीची घोडदौड अशीच कायम राहिल. दीप प्रज्वलन व डोमरेली महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन सभासद राजेंद्र चोपडा व सुरेश सिकची यांनी केले.



रामकृष्ण अर्बन सहकारी क्रेडिट सोसायटीच्या ३९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेप्रसंगी माहिती देताना चेअरमन गोपाल मणियार. समवेत व्हा. चेअरमन मधुसूदन सारडा, सर्व संचालक. सोबत संस्थेचे सभासद.

सोनेतारण कर्ज सुविधे सोबतच कोल्ड स्टोरेज तसेच वेअर हाऊस साठी व्यापाऱ्यांना कमी कागदपत्र घेऊन लुलभ पद्धतीने कर्ज सुविधा देण्यात आली आहे.ज्येष्ठ सभासद सन्मान योजनेअंतर्गत अहवाल सालात १९ ज्येष्ठ सभासदांचा सन्मान करुन त्यांना मानपत्र व रुपये १००० ची ठेव पावती प्रदान केली आहे.तसेच चालू आर्थिक वर्षात सभासदांना १५ टक्के लाभांश देण्याचा ठराव करण्यात आला. संस्थेच्या स्व.मालकीच्या जागेत मुख्य शाखेत सुशोभीकरण व नूतनीकरण करावयाचे आहे.तसेच सभासदांच्या मागणीनुसार लिफ्टची सोय करण्यात येणार आहे.सर्व संचालक मंडळ कोणतेही मानधन व भत्ते न घेता निस्वार्थ भावनेने सहकार्य करीत असल्याने संस्थेची प्रगती होत आहे.तसेच संस्थेचे संस्थापक श्रीगोपाल धुत हे कुबेर पुत्र असल्याने संस्थेची नेहमीच भरभराट झाली आहे.असे प्रतिपादन रामकृष्ण अर्बन सहकारी क्रेडिट सोसायटीचे चेअरमन गोपाल मणियार यांनी केले आहे.

रामकृष्ण अर्बन सहकारी क्रेडिट सोसायटीची ३९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बडीसाजन मंगल कार्यालय येथे रामकृष्ण अर्बनचे चेअरमन गोपाल मणियार यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीत पार पडली. याप्रसंगी सहकार कायद्याप्रमाणे सहकारी प्रशिक्षण संघाचे अधिकारी एल एल साखरे यांनी सभासदांचे प्रशिक्षण घेतले. यावेळी संस्थापक चेअरमन श्रीगोपाल धूत, व्हाईस चेअरमन मधुसूदन सारडा, संचालक ॲड.राजेंद्र गुजराथी, प्रदीप पंजाबी, प्रकाश गांधी, किसनलाल बंग, ओमप्रकाश चांडक, विश्वनाथ कासट, राजेंद्र मालू, ॲड. अशोक बंग, राजेंद्रकुमार कंजोड, श्रीमती मथुराबाई झंवर, प्रा.अनुरीता झगडे, देवराव साठे, व्यवस्थापक शशिकांत पुंडलिक, अधिकारी कुमार आपटे आदींसह सभासद उपस्थित होते.

व्हाईस चेअरमन मधुसूदन सारडा म्हणाले, संस्थेच्या सभासदांना ग्राहकांना अचूक व तत्वर सुविधा देणे.हे संस्थेचे आद्य कर्तव्य आहे.संस्थेत कोअर बँकिंग प्रणालीमध्ये मोबाईल बँकिंग सुविधा, आरटीजीएस, एनईएफटी, क्यू आर कोड, एसएमएस सुद्धा लवकरच सुरु करणार आहोत, असे सांगितले.

सहकारी प्रशिक्षण अधिकारी एस एल साखरे म्हणाले, सभासद हे संस्थेचे मालक असतात. सभासदांनी क्रियाशील राहून संस्थेच्या कार्य सहभाग वाढवला पाहिजे. यासाठी सहकार कायद्यानुसार प्रशिक्षणाची तरतूद करण्यात आली आहे.

वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासद राजेंद्र चोपडा, आर डी मंत्री, सुरेश सिकची, संस्थेचे कायदेशीर सल्लागार ॲड.शरद पह्लोड यांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांना चेअरमन गोपाल मणियार यांनी समर्पक उत्तरे देत बँकेची आर्थिक स्थिती मक्षम असल्याचे निदर्शनास आणून दिले. या उत्तरांबद्दल सर्व उपस्थित सभासदांनी समाधान व्यक्त करीत बँकेचे संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी व एकूणच चांगल्या कारभारावर विश्वास व्यक्त केला. प्रारंभी व्यवस्थापक शशिकांत पुंडलिक यांनी अहवाल वाचन केले व विषयपत्रिकेवर विषयांची माहिती दिली. लेखापरीक्षक म.एन.जे लोहे ॲंड कंपनीचे सीए तुषार लोहे, सीए पुनीत व्होरा, सीए पियुष गुजराथी, सीए प्रसाद भंडारी, सनदी लेखापाल मे.जी.आर.बाहोती ॲंड असोसिएट के सीए गोविंद बाहेती यांनी लेखा परीक्षण केले. विषय पत्रिकेवरील सर्व विषयांना एकमताने मंजूरी देण्यात आली. या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी सभासद उपस्थित होते. सूत्रसंचालन सौ.मीरा मुळे यांनी केले.तर व्हाईस चेअरमन मधुसूदन सारडा यांनी आभार मानले.

परिशिष्ट – १
पाणलोट विकास समिती
मौजे लव्हाळी कोतूल ता. अकोले जि. अहमदनगर
निविदा सुचना क्र. १ सन २०२४–२५

पाणलोट विकास समिती मौजे लव्हाळी कोतूल ता. अकोले जि. अहमदनगर, महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाकडून शा.बां. विभाग / जलसंपदा विभाग/ जलसंधारण महामंडळ/मृद व जलसंधारण (कृषि विभाग) विभाग महाराष्ट्र शासन यांकडेही योग्य तया वार्तातील नोंदणीकृत कंत्राटदारकडून खालील कामाकरीता सी–१ मध्यमातील निविदा मागविल आहेत. निविदा कागदपत्र पाणलोट विकास समिती मौजे लव्हाळी कोतूल ता. अकोले कार्यालय येथे उपलब्ध आहेत. तरीच कोणतीही अथवा सर्व निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार पाणलोट विकास समिती मौजे लव्हाळी कोतूल ता.अकोले जि. अहमदनगर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा विचारणी जाणार नाही!

प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना २.० (PMKSY) सन २०२३ - २४ अंतर्गत

अ. क्र.	कामाचे नाव	अंदाजित रक्कम	निविदाफी	निविदा बयाना रक्कम	काम पूर्ण करण्याचा कालावधी	कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग
१	मौजे–लव्हाळी कोतूल गॅबियन बंधारा गट ३८	१,०२,५४८.००	१००.००	१०२५.००	९० दिवस	खुला

निविदा उपलब्ध कालावधी :– दिनांक : २६/९/२०२४ ते ३/१०/२०२४
निविदा उघडणे :– दिनांक:- ४/१०/२०२४ वेळ:- १३.३० या सकाळी (शक्य असल्यास)
० नविदेवर अटी व शर्तीकरिता वरील कार्यालयाच्या सुचना फलकावर पाहावयास मिळतील.
जाळ/पत्रिका/लव्हाळी कोतूल /निविदा/ /२०२४
दिनांक :- ...../२०२४

अधिव.
पाणलोट विकास समिती,
मौजे- लव्हाळी कोतूल
ता. अकोले जि. अहमदनगर

अहमदनगर शहर – खुली निबंध स्पर्धेला २७ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

नगर – शहरातील खड्डेमय रस्ते, अंधारात साम्राज्य, सदोष ड्रेनेज सिस्टीम (सांडपाणी समस्या), दूषित पिण्याचे पाणी, गुन्हेगारी आणि दहशत, जमिनीची तांबेगारी, बेरोजगारी, रखडलेला औद्योगिक विकास इत्यादी अनेक प्रश्न सामान्य नागरिकांच्या मनाला भेडसावत आहेत. अहम दनगरकांची हीच खंत व विकासाचे स्वप्न आणि संकल्पना कुठेतरी पुढे यायला हवी, त्याला हक्काचे व्यासपीठ मिळायला हवा या उद्देशाने डॉ.अनिल आठरे पाटील मित्र मंडळाच्यावतीनी खुल्या निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. ज्यातून नगर शहराविषयी भूमिका, संकल्पना आणि विचार प्रभावीपणे मांडता येतील. या स्पर्धेला मुदतवाढ देण्यात आली असून २७ सप्टेंबरपर्यंत निबंध जमा करावे आवाहन डॉ.अनिल आठरे यांनी केले आहे.

निबंधाचे विषय :– माझ्या स्वप्नातील अहमदनगर शहर व माझ्या स्वप्नातील माझा प्रभाग/वॉर्ड असे आहेत. पारितोषिक :–प्रथम क्रमांक :– रूपये ७०००, द्वितीय क्रमांक :– रूपये ५०००, तृतीय क्रमांक :– रूपये ३०००, उत्तेजनार्थ :–रूपये १००० व रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र असे बक्षीसाचे स्वरुप आहे. निबंध जमा करण्यासाठी –२७ सप्टेंबर २०२४ पर्यंत सकाळी १० ते संध्या ६ या वेळेत जमा करावेत.

निबंध जमा करण्याचे ठिकाण –आठरे पाटील मेमोरियल हॉस्पिटल, झोपडी कॅंटीन समोर अहमदनगर.

धम्माल मनोरंजन

सुविचार

अरोल काळाहाती मरणे। परंतु आमुच्या हाती जगणे।

तात्पर्य : जन्माला येणारा प्रत्येक मनुष्य केव्हा ना केव्हा जाणारच. ते कोणाच्या हातात नाही. परंतु आपण चांगले जीवन कसे जगावे, कर्तृत्वाने पुढे कसे यावे, समाजप्रिय कसे व्हावे, इतरांच्या सुखात सुख कसे मानावे, अडचणींवर कल्पकतेने कशी मात करावी, इत्यादी अनेक गोष्टी आपल्या हातात असतात.

आशावादी विसरण्यासाठी हसतो आणि निराशावादी हसण्याचे विसरतो.

तात्पर्य : आशावादी मनुष्य भविष्यकाळावर नजर ठेवून आपल्याला आलेल्या अपयशाबद्दल होणारे दुःख विसरण्यासाठी हसतो. अपयशाने तो खचून जात नाही. आपले प्रयत्न सोडीत नाही. परंतु निराशावादी मनुष्य त्याला आलेल्या अपयशाने भयंकर दुःखी होतो. यासाठी अपयशाने धीर सोडू नका. हसत हसत अपयश पचवून पुन्हा प्रयत्नाला लागा.

दिनविशेष २७ सप्टेंबर २०२४

१६०५: लुई (तेरावा) – फ्रान्सचा राजा (मृत्यू. १४ मे १६४३)

१७२२: अमेरीकन क्रांतिकारी सॅम्एल ॲडम्स यांचा जन्म.

१९०७: भारतीय क्रांतिकारी भगत सिंग यांचा जन्म.

१९०७: वामनराव देशपांडे – संगीत समीक्षक (मृत्यू. ? ? १९९०)

१९३२: यश चोप्रा – चित्रपट दिग्दर्शक, पटकथालेखक आणि निर्माते (मृत्यू. २१ आक्टोबर २०१२)

१९३३: चित्रपट निर्माते व दिग्दर्शक यश चोप्रा यांचा जन्म. (मृत्यू. २१ ऑक्टोबर २०१२)

१९५३: माता अमृतानंदमयी

१९६२: गेव्हिन लार्सन – न्यूझीलंडचा क्रिकेटपटू

१९७४: भारतीय क्रिकेट खेळाडू पंकज धर्माणी यांचा जन्म.

१९८१: लक्ष्मीपती बालाजी – क्रिकेटपटू

१९८१: ब्रॅन्डन मॅककलम – न्यूझीलंडचा क्रिकेटपटू

मृत्यू / पुण्यतिथी / स्मृतिदिन:

१७२९: मराठेशाहीच्या आपत्प्रसंगी पराक्रम गाजवणारे खंडेराव दाभाडे यांचे निधन. दाभाडे घराण्याला सातशे गावांची देसमुखी असल्यामुळे त्यांना वतनदारांचे मुकुटमणी म्हणत.

१८३३: राजा राम मोहन रॉय – समाजसुधारक, धर्मसुधारक व ब्राम्ही समाजाचे संस्थापक, कन्याविक्रय, कन्याहत्या, बालविवाह इ. चालींमधून स्त्रीला मुक्त करण्यासाठी त्यांनी आंदोलन उभारले. (जन्म: २२ मे १७७२)

१९१७: फ्रेंच चित्रकार एदगा देगास यांचे निधन.

१९२९: शिवराम महादेव परांजपे – 'काळ' कर्ते, विद्वान, वक्ते, लेखक, स्वातंत्र्यसैनिक व पत्रकार (जन्म: २७ जून १८६४)

१९७२: एस. आर. रंगनाथन – भारतीय गणितज्ञ व ग्रंथालयशास्त्रज्ञ (जन्म: १२ ऑगस्ट १८९२)

१९७५: तिरुवॅकर राजेंद्र शेषाद्री – रसायनशास्त्रज्ञ (जन्म: ३ फेब्रुवारी १९००)

१९९२: अनुताई वाघ – समाजसेविका (जन्म: १७ मार्च १९१०)

१९९९: डॉ. मेबल आरोळे – रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेत्या बहुद्देशीय ग्रामीण आरोग्य प्रकल्पाच्या संचालिका (जन्म: २६ डिसेंबर १९३५)

२००४: शोभा गुर्टू – शास्त्रीय गायिका (जन्म: ८ फेब्रुवारी १९२५)

२००८: महेन्द्र कपूर – पार्श्वगायक (जन्म: ९ जानेवारी १९३४ – अमृतसर)

२०१२: भारतीय दिग्दर्शक आणि पटकथालेखक संजय सूरकर यांचे निधन. (जन्म: १९ ऑगस्ट १९५१)

२०१५: भारतीय लेखक आणि राजकारणी सय्यद अहमद यांचे निधन. (जन्म: ६ मार्च १९४५)

२०१५: भारतीय कार्यकर्ते आणि लेखक कॉलन पोकुकुडन यांचे निधन.

विनोद

एक मांजर आपल्या आवडत्या बोक्याला भेटायला गेली. तिला लंगडतांना पाहून बोक्याने विचारलं, पायाला काय झालं गं?' मनी म्हणाली, 'मी घरातून बाहेर पडले, तेव्हा अपशकुन झाला, त्यापायेळी ओळखलं की आज काहीतरी वाईट घडणार आणि तसंच झालं. एकानं माझ्या पायावरनं सायकल नेली नि माझा पाय दुखावला.' 'अगं, पण कसला अपशकुन झाला?' मनी म्हणाली, 'अरे, मी रस्तालून येत होते, तेव्हा माणूस आडवा गेला.

विरंगुळा

पद्धत: बाजुला दिलेल्या असंबद्ध शब्दामधून एक अर्थपूर्ण शब्द तयार होतो तो चौकटीत लिहा व ■ मध्ये लिहिल्या गेलेल्या शब्दातून एक शब्द तयार होतो त्या शब्दाच्या सहाय्याने दिलेले अर्धवट वाक्य पूर्ण करा.

श ा र ा ि ि व र	■ ■ ■ ■
ल ् ा ि म अ ा प	■ ■ ■ ■
ल े ा न म अ	■ ■ ■ ■
र ा व ा द द े	■ ■ ■ ■

काळासारखा घन्वंतरी दुसरा कोणी नाही. दुभंगलेले हृदय कसे जोडावे आणि वठलेले झाड कसे ■ ■ ■ ■ हे त्याला कळत असते.

अ	रे	रा	बी
दे	श	प्रे	मी

ले	का	प	ती

मागील उत्तर : देविका

शब्दरंजन

आडवे संकेत

१) एक प्रसिद्ध नाटककार
८) एक राणिणी, दुर्गा
१०) विनता, विनय
११) दिसेनासे होणे
१२) डोंगराची तुटलेली सुळका, खबदडी
१३) शिंकाळी १५) सोसणे
१६) अरण्य, जंगल
१७) रानटी कबुतर
१८) ठाण्याचा मुख्य
२०) नशीब
२१) म्हाख्या, पुढारी
२२) भरीव, ठणठणीत
२४) धैर्य, हिंमत
२५) काळोख, अंधार
२७) खस
२९) पेन, पेन्सील, टाक इ. ठेविण्याची पेटी
३१)लुकुड तासण्याचे एक साधन
३४) आर्याछंद, रचना
३६) भिती, धाकदपटशा
३७) खोबऱ्याचा चुरा
३९) उसाचे पीक, रिकामपण
४०) वाळू
४२) मानवी रक्ताला चटावलेला
४४) मध्यान्हीची भयंकर उष्णता
४५) माथा, मस्तक, भाल
४६) पुढे जाणे
४८) एक व पाव
४९) पोटात पुचळ्ळ दिवस राहिलेला गर्भ
५०) हिंदुचे मुख्य दोन सण
५३) पत्नी
५४) लहान खण असलेली लहान पिशवी
५५) बरोबरी
५६) लाकुडकाम करणारा

उभे संकेत

१) अंतर्वेधी
२) विडी, सिगरेट पिणे
३) रांग, ओळ
४) वजनदार ५) मोठी फांदी
६) पिकांना वाळवून टाकणारी एक विळ
७) वाकणे, झुकणे
९) हवा घालणारा पंखा
१४) आजारातून बरा झालेला, फ्रेंज्ञ १५)खजिन्यावरील मुख्य अधिकारी
१७)पर्जन्यकाळ१८) योग्य, बरोबर
१९) गर्द, पूर्ण भरलेले
२०) चांगल्या नशिबाचा
२३) पत्नी, सखा
२६) छंदिष्ट, दुर्व्यसनी
२८) नोकदार
३०) तेज, चकाकी
३१) विष्णूचे एक नाव
३२) टिपासह ३३) भ्रमण
३५) हवाबदल ३८) चिता
३९) वारस आहे असा दावा करणारा
४१) एक तेल बी
४३) आठवड्यातील एक दिवस
४५) कौशल्य
४७) मळ, उसाचे घाण पाणी
५१) खरी गोष्ट, खरे
५२) दिवस, दिन

कालचे उत्तर

ल			ह	व	र	ट		मा	थे	कि	रू	
वं	दे	मा	त	र	म			न	र		प	सा
ग	व	ग	वा		णे		ओ	लि	डा		की	र
	त		रें			को		य		ग	रु	डा
आ	रु	ढ		क	वा	य	त		मा		णी	
ज		क	सा	ब	स		फा		न		चो	च
व	डी	ल	ध्वा	स		गा	व	रा	नी		रो	म
र		चं			गा	व	त		य		क्र	च
	भा	द	व	ड		गुं		म		आ	रा	म
पं	गु		ट		घ	ड	चं	खी			जा	
	बा		व	स	न		ग	त	क्र	ळ		स
बा	ई	बा	ट	ली		र	डी		स		मा	ह
की		ळी		म	न	य	णे		व	धं	मा	न



१) आशियातील पहिले ध्वनी वेगी विमान भारतात कधी तयार झाले?
अ)१९६२ ब)१९६१ क)१९६० ड) १९६८

२) इतिहासचार्य विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांचा जन्म कधी झाला?
अ) १८६० ब)१८६३ क)१८६५ ड)१९६९

३) लंडन येथील सेंट थॉमस रुग्णालयात परिचारिका प्रशिक्षणाला कधी सुरुवात झाली?
अ)१८७२ ब)१८७१ क)१८६५ ड)१८६०

४) वंदे मातरम्चे जनक बक्किमचंद चट्टोपाध्याय यांचा जन्मदिन खालीलपैकी कोणता?
अ)२५ जून १८२५ ब)२५ जून १८३२
क)२५ जून १८३८ ड)२५ जून १८३९

५) स्व. माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी भारतात आणीबाणी कोणत्या वर्षी जाहिर केली?
अ)१९७१ ब)१९७२ क)१९७४ ड)१९७५

६) राष्ट्रभक्त दामोदर हरी चाफेकर यांचा जन्मदिन खालीलपैकी कोणता?
अ)१ जून १८६९ ब)१२ जून १८९० क)७ मार्च १८६१
ड)२५ जून १८६९

७) कपिलदेवच्या नेतृत्त्वाखाली भारताने प्रथमच एकदिवसीय सामन्यामधे वर्ल्ड कप कधी जिंकला? अ) २५ जून १९८५ ब)२५ जून १९८३क)२५ जून १९८६ ड)२५ जून १९८२

८) जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिन खालीलपैकी कोणता?
अ)१२ एप्रिल ब)२७ मार्च क)२६ जून ड) १२ जानेवारी

९) प्रसिद्ध नट बाल गंधर्व उर्फ नारायण श्रीपाद राजहंस यांचा जन्म कोणत्या वर्षी झाला?
अ)१८८२ ब)१८८६ क)१८८८ ड)१८९०

१०) एअर इंडियाचे पहिले बोइंग विमान गौरीशंकर कधी कोसळले?
अ)१९७२ ब)१९८१ क)१९८२ ड)१९८४

११) हेलन केलर यांचा जन्मदिवस खालीलपैकी कोणता?
अ)२७ जून १८८७ ब)२७ जून १८८०
क)२७ जून १८८२ ड)२७ जून १८८१

१२) मराठे शाहीतील शूर सेनापती धनाजी जाधव यांचे निधन कधी झाले?
अ) १७१० ब)१८१० क)१७१२ ड)१७२१

१३) शीख साम्राज्याचा नायनाट करु पाहणाऱ्या झंझांना दीर्घ काळ थोपवून धरणारा
पराक्रमी महाराणा प्रताप सिंह यांचे निधन कधी झाले?
अ) १८३२ ब)१८३६ क)१८३८ ड)१८३९

१४) काळ या वृत्तपत्राचे संपादक व प्रखर राष्ट्रीय नेते शि. म. परांजपे यांचा जन्मदिन खालीलपैकी कोणता?
अ) १२ जून १८६९ ब)१४ जून १८६८ क)१९ जून १८६८
ड)१२ एप्रिल १८६४

१५) प्रसिद्ध साहित्यिक व समिक्षक रंगाधर पाणतावणे यांचा जन्मदिन खालीलपैकी कोणता?
अ) १२ एप्रिल १९३७ ब)१० जानेवारी १९३७
क)८ ऑगस्ट १९३७ ड)२८ जुन १९३७

१६) जगप्रसिद्ध संख्याशास्त्रज्ञ प्रशांतचंद्र महानोबीस यांचे निधन कोणत्या वर्षी झाले?
अ) १९६५ ब)१९६८ क)१९७२ड)१९८०

१७) माजी पंतप्रधान स्व. पी.व्ही. नरसिंहराव यांचा जन्मदिन खालीलपैकी कोणता?
अ)१२ डिसेंबर १९२१ ब) ६ एप्रिल १९२१क)७ मे १९३१ ड) २८ जून १९२१

१८) पहिल्या महायुद्धात जर्मनीने व्हर्सायच्या तहाच्या अटी कधी स्वीकारल्या?
अ)२२ जून १९१९ ब)२८ जून १९१९ क)१२ एप्रिल १९१९ ड) २८ जून १९१९

१९) भारत इतिहास संशोधक मंडळाची स्थापना कोणत्या वर्षी करण्यात आली?
अ)१९०१ ब)१९०५ क)१९०६ ड)१९१२

उत्तर: (१–ब), (२–ब), (३–ड), (४–क), (५–ड), (६–ड), (७–ब), (८–क), (९–क), (१०–क), (११–ब), (१२–अ), (१३–ड), (१४–क), (१५–ड), (१६–क), (१७–ड), (१८–ड), (१९–अ),

फिल्मीरंजन

आडवे संकेत

१) तेरे नाम या चित्रपटाचे संगीतकार. २) का गुलाम (चित्रपट) ३) सन १९८३ मध्ये मोहन कुमार दिग्दर्शीत या चित्रपटात राजेश खन्ना, शबाना आझमी होते. ६) सन १९९९ मध्ये दिग्दर्शक विरु देवगनच्या या चित्रपटात अजय देवगन व मनिषा कोईराला होते.
९) अग्निहोत्री (नायीका)
१०) राहुल बोल व करिना कपूर अभिनीत चित्रपट.
११) सन १९९९ मध्ये आलेल्या या चित्रपटात अनुपम खेर व डिम्पल कपाडिया होते.
१३) कमल (चित्रपट)
१४) संजय लिला भंसाली दिग्दर्शीत या चित्रपटात अजय देवगन, ऐश्वर्या रॉय आणि सलमान खान होते. १८) सनम (चित्रपट) १९) सन १९९९ मध्ये राजकंवर दिग्दर्शीत या चित्रपटात संजय दत्त आणि चंद्रमुख सिंह, महिला चौधरी होते.
२१) सन १९७१ मध्ये सी.पी. दिक्षीत दिग्दर्शीत या चित्रपटात शत्रून सिन्हा व राखी होते.
२२) पती पत्नी और (चित्रपट) २३) सन १९८४ मध्ये के. बापैय्या दिग्दर्शीत या चित्रपटात राजेश खन्ना व श्रीदेवी होते. २५) महेश भट्ट दिग्दर्शीत या चित्रपटात जैकी श्रॉफ व मनिषा कोईराला होते.
२६) अक्षय कुमार, आयशा जुल्का आणि सुनील शेट्टी, ममता कुलकर्णी यांचा चित्रपट.२७) आगा (गायीका) २८) सन १९७२ मध्ये मोहन सहगल दिग्दर्शीत या चित्रपटात धर्मेंद्र व हेमा मालिनी होते.

उभे संकेत

१) अरशद वारसी व नम्रता शिरोडकर अभिनीत चित्रपट.
२) सनी देओल व सुष्मिता सेन अभिनीत चित्रपट.
३) अबकर ॲथोनी (चित्रपट)
४) अक्षय खन्ना, ऐश्वर्या रॉय आणि अनिल कपूर यांचा चित्रपट.
५) सन १९८३ मध्ये के. बापैय्या दिग्दर्शीत या चित्रपटात जितेंद्र व श्रीदेवी होते. ७) सन १९८२ मध्ये प्रकाश मेहरा दिग्दर्शीत या चित्रपटात अमिताभ बचन व स्मिता पाटील होते.
८) सन १९८० मध्ये दिग्दर्शक सुभाष घईच्या या चित्रपटात ऋषी कपूर व टिनु मुनीम होते. १०) सन १९७६ मध्ये रामानंद सागर दिग्दर्शीत या चित्रपटात धर्मेंद्र व हेमा मालिनी होते.
१२) सनी देओल, सुनील शेट्टी आणि अजय जडेजा यांचा चित्रपट.
१५) सन १९७७ मध्ये यश चोपडा दिग्दर्शीत या चित्रपटात शाहरुख खान, करिश्मा कपूर आणि माधुरी दीक्षीत होते.
१६) डोला रे डोला रे डोला... हे गाणं या चित्रपटातील आहे.
१७) इंदीरा (चित्रपट)
१८) सन १९९२ मध्ये के. विश्वनाथ दिग्दर्शीत या चित्रपटात जैकी श्रॉफ व माधुरी दीक्षीत होते.
२०) सन १९९९ मध्ये दिग्दर्शक ललित बिप्रीश्या चित्रपटात अक्षय खन्ना, सोनाली बेंद्रे होते.
२३) सन १९९८ मध्ये अनिल शर्मा च्या या चित्रपटात गोविंदा व मनिषा कोईराला होते. २४) मिथून चक्रवर्ती, आयशा जुल्का आणि राज बब्बर यांचा चित्रपट.
२५) मोहन (चित्रपट)

मागील फिल्मी उत्तर

क	म	ल	ह	स	न		श्रि	या	शा	बा	रू	
या			म		गी		पी				रे	खा
म	न		दि	वा	ना	प	न				श	
त		जा	ल					ई	शा	दे	ओ	ल
	दी		दे	व	दा	स		शा			वे	
घ	र		चु			ल		क्षे	ई		रों	
र			के			मा		भी		ज	य	
मे	री	क	स	म		न	म	क		ति		अ
रा			न			खा		र		न		के
म		बु	म		जा	न	की		दि	ल	चा	ले
		लं		जा	दु		म			ली		ह
	न	दी	ता		गा		श	रा	र	त		म
धं	दा		ल		र		मां		ती			

'सिद्धार्थ वाणी'

उपप्रवर्तक श्री सिद्धार्थनुनीजी म.सा. तथा महासतीजी डॉ. सौम्याश्रीजी आदि ठाणा ३ इनका चातुर्मास सावेडी स्थानक मे विराजमान है।

प्रस्तुत श्लोक में आचार्यश्रीनी प्रभु आदिनाथच्या अचल गुणांचे स्मरण करून भगवंताच्या चरणी १६ वे भक्तिपुष्प अर्पण केले आहे.

चौदा राज्यांपैकी फक्त अडीच बेटांवर मानवांची वस्ती आहे, म्हणून त्याला मानवी जग असेही म्हणतात. या जगात रत्नांचा प्रकाश आहे. पाताळातील पहिल्या तीन नरकात रत्न, साखर आणि वाळू अशी चमक आहे. दुजुस्या नरकात चिखल आहे. पाचव्या नरकात धर आहे आणि सातव्या नरकात अंधार आहे. मानवी जगात दिवसा सूर्यप्रकाश असो. अंधार दूर करण्यासाठी संसारी लोक शेकडो दिवे आणि विजेचे बल्ब लावतकात तरीही अंधाराचे काही मागच दूर करता येतात. प्रकाशदूष्टया आचार्यश्रींनी वीतराग प्रभूंच्या केवलज्ञान दीपकची तुलना मातीच्या दिव्याशी करण्याचा प्रयत्न केला. परंतु मातीचा दिवा लावण्यासाठी तेल आणि वात आवश्यक होती. तो अंधार खातो आणि धूर काढतो. केवळ मयादित क्षेत्र प्रकाशित करतो आणि तो वाऱ्याच्या एका झोक्यात विझतो. माणूस फक्त प्रकाशाच्या प्रवासावर विश्वास ठेवतो. ''तुमसोर्म ज्योतिर्गमय'' अंधारातून प्रकाशाकडे म्हणजेच कायम प्रकाशाकडे जाणे हा मानवाचा स्वभाव आहे.

दिव्याचा एक विशेष गुण असा आहे की, तो स्वतः प्रकाशित करतो आणि विझलेल्या शेकडो दिव्यांना प्रकाश देतो. दिव्याचे वैशिष्ट्य सूर्य, चंद्र किंवा रत्नांमध्येही दिसत नाही. प्रस्तुत श्लोकात १० व्या जगाच्या भावनांची पुनरावृत्ती झाली आहे. हे प्रभू! एक सामान्य तेलाचा दिवा देखील इतर दिवे प्रकाशित करू शकतो, मग तुमच्या ज्ञान इत्यादी गुणांच्या संपर्कात आल्यानंतर साधक केवळ ज्ञानाच्या रूपाने अतिरिक्त आध्यात्मिक दिवा लावतो हे आश्चर्यकारक आहे का? सामान्य मातीच्या दिव्यातील दोष दाखवून परम दिव्यावर लवचिक दिव्यावर आपली श्रद्धा केंद्रित करणे हे स्वावलंबी आचार्यश्रींचे कर्तव्य आहे. संपूर्ण जग एका छोट्या दिव्याने प्रकाशित होऊ शकत नाही, तरीही प्रकाशासाठी या मातीच्या दिव्याचा त्याग खरोखरच बलिदान आहे.

''माझे हे शरीर वातीसारखं होवो, माझं मन तेलासारखं जळून जगाला प्रकाश देवो, माझं जीवन दिव्यासारखं होवो, माझं जीवन त्यागाचा मार्ग होवो हेच मी तुमच्याकडे मागत आहे. माझ्या ओठात ज्ञानाचा स्त्रोत दे, हेच मी तुमच्याकडे वर मागत आहे.''

कार्तिक अमावस्याच्या मध्यरात्रीत पावापुरी येथे श्रमण भगवान महावीर स्वामींनी निर्वाण प्राप्त केले, तेव्हा रत्न-रत्नांनी बनवलेल्या दिव्यांनी सर्वत्र देव-देवतांनी प्रकाश पसरवला, पण जेव्हा देव-देवतांची चलबिचल थांबली तेव्हा मानवाने आपल्या क्षमतेनुसार सोने, चांदी आणि मातीचे दिवे लावले. दिवा सोन्याचा असो वा चांदीचा, मातीचा असो वा इतरत्र कोणत्याही धातूचा पण त्याचा प्रकाश महत्त्वाचा असतो. सोन्याच्या दिव्याला प्रकाश नसेल तर तो निरुपयोगी आहे. मातीच्या दिव्याप्रमाणे जीवनाचा हा दिवाही तेव्हाच उजळतो, जेव्हा त्यात श्रद्धेचे तेल आणि निष्ठेची वात असते. श्रद्धेशिवाय मनात ज्ञानाचा प्रकाश प्रज्वलित होऊ शकत नाही. घगुती जीवनात प्रेम आणि निष्ठेचे तेल लागते, तरच घराचा अभिमान होतो. दिवे चार प्रकारचे आहेत- (१) दिवसाचा दिवा (२) रात्रीचा दिवा (३) कुळाचा दिवा - पुत्र (४) तिन्ही लोकाचा दिवा, तीर्थंकर देव यांनी दर्शवलेला धर्म.

अहो त्रैलोक्यप्रकाशक अदभुत अलौकिक भाव-दीपक आपल्याला माझा नमस्कार! आपण ज्ञानरनिर्मय प्रदीप! माझे मन कधी आणि कसे प्रबुद्ध होईल? तुमच्या नकळत मनाच्या वातला स्पर्श झाला की मीही घाबरून जाईन, तरच माझा आत्मा प्रकाशमान होईल.

*** गाथा * (१६)**

निर्धुम-वर्तिरपवर्जित - तैलपुर -
कृत्स्नं जगत्प्रयर्मद प्रकटी-करोषि ।
गम्यो न जातु मरुतां चलिता-चलानाम्
दीपोऽपरस्त्वमसि नाथ । जगत् प्रकाशः ।।१६।।

अर्थ- हे परमेश्वरा! तू एक अद्वितीय दीप आहेस. ज्यामध्ये तिन्ही लोकांचे सर्व पदार्थ त्यांच्या भौतिक गुणांसह आणि पर्यायांसह शाश्वत ज्ञानाच्या अखंड प्रकाशाच्या संदर्भात स्वयंप्रकाशित आहेत. तुमचे जीवन आसक्तीने देदीप्यमान नाही, तर रसहीनतेच्या जाणिवेने भरलेले आहे. स्वतःमध्ये पूर्णपणे शुद्ध आणि एकरूप असल्यामुळे तुम्ही कोणाकडूनही अपेक्षा ठेवत नाही. सांसारिक अडथळे तुम्हाला अखंड आनंद मिळवण्यात अडथळे आणू शकत नाहीत म्हणून तुम्ही सांसारिक दिव्यापासून पूर्णपणे भिन्न नाहीत, एक अलौकिक आत्म-प्रकाशक एक अविनाशी अद्वितीय चमकणारा दिवा आहे.

- सौ. सविता चोरडिया

'आम्हाला शिकवू द्या' साठी एकवटले हजारो शिक्षक

जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा

नगर - राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळा या उपक्रमांच्या प्रयोगशाळा बनल्या असुन शिक्षकांना शिकवण्याचे काम सोडून विविध ऑनलाईन कामे व अनावश्यक उपक्रम राबवल्यामुळे विद्यार्थ्यांपुढे जाऊन शिकवण्यासाठी वेळच मिळत नाही. त्यामुळे आम्हाला शिकवू द्या असा टाहो फोडत जिल्हाधिकारी कार्यालयावर जिल्हाप्रतीक ९ हजार शिक्षकानी आक्रोश मोर्चा काढला.

या आक्रोश मोर्चाला खा. निलेश लंके यांनी पाठिंबा दर्शवीत म्हणाले की, शिक्षकाचा मुलगा असून शिक्षकांची अडीअडचणी मला माहित आहे. त्यामुळे मी शिक्षकांचे प्रश्न हे दिल्लीत मांडणार व शिक्षकांनी कोणत्याही प्रकारचे ऑनलाइन कामे करू नये असल्याची भावना व्यक्त केली.

आ. सत्यजित तांबे यांनी देखील पाठिंबा देत म्हणाले की, शिक्षकांना दिलेल्या ऑनलाईन कामामुळे गोरगरीब जनतेचे मुले शिक्षणापासून वंचित होत आहे व सरकारचा विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित ठेवायचा डाव आहे की काय असा सवाल करत शिक्षकांच्या प्रत्येक मागणीसाठी आवाज उठवणार असल्याची भावना व्यक्त केली.

जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चात सहभागी झालेले शिक्षक.

सततच्या अशैक्षणिक कामांच्या वाढत्या वारंवारितेमुळे शिक्षकांना शिकविण्यास पुरेसा वेळ मिळत नाही. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपासून शिक्षकांना दूर लोटण्याचे धोरण सरकारने आखले आहे की काय अशी शंका उपस्थित केली जात आहे. दुर्गम भागातील कमी पटाच्या शाळा बंद करून तेथील विद्यार्थ्यांना शालेय प्रवाहातून बाहेर फेकण्याचे काम सरकार करत आहे. २० पेक्षा कमी पटाच्या शाळेवर निवृत्त शिक्षक किंवा कंत्राटी शिक्षकाची नेमणूक करून सरकार अप्रत्यक्षपणे वेठबिगारीचे धोरण राबवत आहे. शिक्षकांच्या अनेक ज्वलंत प्रश्नांबाबत शासन स्तरावरून कोणतीही अनुकूल भूमिका घेतली जात नाही. प्रश्न समजून घेणे व त्यावर तोडगा काढण्याच्या बाबत सरकार प्रचंड उदासीन आहे. यामध्ये प्रामुख्याने शिक्षकांच्या विविध मागण्या खालील प्रमाणे. १५ मार्च व ५ सप्टेंबर २०२४ रोजीच्या शासन निर्णयामुळे या असंतोषात भरच पडली आहे. विशेष म्हणजे या शासन निर्णयामुळे शिक्षण हक्क कायदा २००९ मधील तरतुदीचा उघड उघड भंग केला जात आहे. त्यामुळे राज्यातील प्राथमिक शिक्षकांपुढे तीव्र आंदोलन करण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. राज्यातील सर्व सध्या राज्याच्या शिक्षण खात्यामध्ये विविध प्रकारचे प्रयोग राबवले जात आहेत आणि प्राथमिक शिक्षकांना वेठबिगारासारखे त्या प्रयोगासाठी राबवले जात आहे. त्यामुळे शिकवण्यासाठी शिक्षकांकडे वेळच शिल्लक नाही. नोव्हेंबर २००५ नंतर सेवेत दाखल झालेल्या शिक्षकांना १९८२ सालची जुनी पेन्शन योजना लागू करणे, शालेय पोषण आहाराच्या बदललेल्या पाकक्रतींमुळे शिक्षकांच्या अशैक्षणिक कामात भरच पडली असून ही योजना स्वतंत्र यंत्रणेकडे हस्तांतरित करणे, १०-२०-३० वर्ष सेवेनंतरची आबासित प्रगती योजना प्राथमिक शिक्षकांना लागू कराणे, मुख्यालयी राहण्याची अट शिथिल करणे, अशैक्षणिक कामे कमी करणे इत्यादी प्रमुख मागण्यांसह शिक्षकांच्या इतर अनेक मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी शाळाबाह्य व ऑनलाईन कामाच्या ओझ्या खाली शिक्षक अक्षरशः दबून गेला आहे. विविध प्रकारची सर्वेक्षणे, वेगवेगळ्या ऑनलाईन माहित्यांची लिंक, एक्सेल फाईल तातडीने भरणे, विविध उपक्रमांचे फोटो लिंकवरून अपलोड करणे, शाळास्तरावर वेगवेगळ्या प्रकारच्या ११ समित्यांची बैठक घेणे, इतिवृत्त तयार करणे, आवश्यक मालाचा पुरवठा नसताना बदललेल्या पाकक्रतीप्रमाणे शालेय पोषण आहार देण्याचे अनाकलनीय आदेश, अत्यंत कमी शिलाई खर्चामध्ये स्थानिक स्तरावर गणवेश शिवून घेणे इत्यादी अनेक वेगवेगळे शाळाबाह्य कामे सध्या शिक्षकांच्या माथी मारलेली आहेत त्यामुळे मुलांना शिकवण्याच्या मूल कामापासून शिक्षक दूर गेला असल्याचा आरोप जिल्हाधीतल सर्व संघटनांकडून करण्यात येत आहे.

अहमदनगर जिल्हाधीतल सर्व संघटनेच्या समन्वय समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर 'आम्हाला शिकवू द्या' या मागणीसाठी आक्रोश मोर्चा काढण्यात आला असून यामध्ये शिक्षक समन्वय मध्यवर्ती संघटनेचे राज्याध्यक्ष केशवराव जाधव, अहमदनगर जिल्हा शिक्षक समन्वय समितीचे राजेंद्र ठोकळ, बापूसाहेब तांबे, राजेंद्र शिंदे, संजय कळमकर, सिताराम सावंत, बबन गाडेकर, दत्ता पाटील कुलट, विद्यातावई आढाव, बाबासाहेब सालडे, प्रवीण झावरे, प्रवीण ढुबे, नाना गाढवे, कल्याण लवांडे, गोकुळ कळमकर, अशोक नवसे, शरद वाढेकर, संतोष दुसुंगे, गजानन जाधव, सुनील शिंदे, संजय धामणे, प्रदीप दळवी, संतोष खामकर, एकनाथ व्यवहारे, अरविंद थोरात, गणेश महाडिक, नवनाथ राठोड, सचिन नाबगे, साहेबराव अनाप, सुनील पवळे, अर्जुन शिरसाट, संतोष सरोदे, गा. मा. मिसाळ, महासरे सर, नवनाथ अडसूळ, दत्ता जाधव, प्रकाश नांगरे, नारायण पिसे, विजय महामुनी आदीसह अहमदनगर जिल्हाधीतल सर्व प्राथमिक शिक्षक उपस्थित होते.

नगर येथील दीपक खिलवाणी उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला रवाना

नगर - येथील दीपक लालचंद खिलवाणी हे इथिकल हॅकिंगचे उच्च प्रशिक्षण घेण्यासाठी अमेरिकेतील फ्लाडेल्फीया या ठिकणी रवाना झाले. दीपक यांचे १२ वी पर्यंत चे शिक्षण भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल येथे झाले तर कॉम्प्युटर हॅकिंगच्या अभ्यासक्रमासाठी पुणे येथील फर्ग्युसन महाविद्यालयात प्रवेश घेतला. आता उच्च शिक्षणासाठी ते अमेरिकेला रवाना झाले.

सिंधी समाजाचे व मार्केट यार्ड मधील आनंद रस्सीवाले माथव खिलवाणी यांचे ते पुतणे होत. तर लालचंद व सौ. मनीषा खिलवाणी यांचे ते ज्येष्ठ पुत्र होत.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या धुळे जिल्हा निरीक्षकपदी बाळासाहेब नाहाटा

आगामी काळात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे नगर जिल्हाध्यक्ष बाळासाहेब नाहाटा यांची धुळे जिल्हा निरीक्षकपदी त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार व पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे यांनी ही नियुक्ती केली आहे. या नियुक्तीचे पत्र मुंबईत झालेल्या बैठकीत प्रदेश सचिवदर्शक आ.शिवाजीराव गर्जे यांनी दिले.

रात्रीच्या वेळी फिरणाऱ्या तिघांना पोलिसांच्या गस्ती पथकाने पकडले

नगर - चोरी करण्याच्या उद्देशाने रात्रीच्या वेळी फिरणाऱ्या तिघांना नगर तालुका पोलिसांच्या रात्र गस्ती पथकाने पकडले. त्यांच्या विरोधात तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अंमलदार मंगेश खरमाळे यांनी फिर्याद दिली आहे.

सुभाष मिभराव पडुळकर, राहुल सुभाष पडुळकर, विशाल सुभाष पडुळकर (सर्व रा. लाडगाव, ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर) अशी पकडलेल्या तिघांची नावे आहेत. मंगळवारी (दि. २४ सप्टेंबर) पहाटे चारच्या सुमारास आंबीलवाडी (ता. नगर) शिवारात पोलिसांनी ही कारवाई केली.

सहायक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गिते यांच्या माहीतीनुसार नगर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे पथक मंगळवारी पहाटे आंबीलवाडी शिवारात गस्त घालत असताना त्यांना तीन संशयित व्यक्ती दिसून आल्या. त्यांना पोलिसांनी ताब्यांत घेत त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी त्यांची नावे सुभाष मिभराव पडुळकर, राहुल सुभाष पडुळकर, विशाल सुभाष पडुळकर अशी सांगितली. त्यांनी आंबीलवाडी शिवारात येण्याचे कारण पोलिसांना सांगितले नाही. रात्रीच्या वेळी चोरी करण्याच्या उद्देशाने ते फिरत असल्याचे पोलिसांच्या चौकशीतून समोर आले. त्यामुळे पोलिसांनी त्याला ताब्यात घेत गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोलीस अंमलदार गांगर्डे करत आहेत.

आरोग्य विभागात १० वर्षे सेवा पूर्ण करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचा शासकीय सेवेत समावेश

मंगल भुजबल यांच्या लढ्याला यश

नगर - आरोग्य विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना १० वर्ष सेवेत पूर्ण आहेत त्यांना शासन सेवेत समाविष्ट करून घेण्याचा जीआर काढून १० वर्ष पूर्ण असलेल्या कर्मचाऱ्यांची सेवा ज्येष्ठता यादी शासनास तयार केली असून त्यांना रिक्त पदावर शासन सेवेत समाविष्ट करून घेण्याची प्रक्रिया सुरु केली आहे त्यामुळे मंगल भुजबल यांच्या लढ्याला मोठे यश मिळाले असल्याने शासकीय सेवेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

राज्यातील आरोग्य विभागातील कंत्राटी कर्मचारी यांना शासन सेवेत समाविष्ट करून घ्यावे म्हणून मंगल भुजबल यांच्या नेतृत्वात गेल्या १० वर्षापासून संघटनेचे पदाधिकारी, सदस्य यांनी वेळोवेळी सरकारविरोधात आंदोलन करून, सरकारला निवेदन देऊन कंत्राटी कर्मचारी यांना कायम सेवेत करण्याची मागणी करत होते त्यासाठी अहमदनगर जिल्ह्यात २०१८ ला कलेक्टर ऑफिस समोर मंगल भुजबल यांनी मोठे आंदोलन उभारले होते तसेच त्यानंतर राज्यभरात प्रत्येक जिल्ह्यात आंदोलने करण्यात आली होती. प्रत्येक वर्षी मुंबई येथे संघटनेचे अधिवेशन घेऊन संघटनेला दिशा देण्याचे काम त्या करत होत्या. गेल्यावर्षी २ व ३ ऑक्टोबर २०२२ व २०२३ रोजी मुंबई येथे आजाद मैदानमध्ये मोठया प्रमाणात संघटनेच्या बंधू व महिला भगिनींना सोबत घेऊन बेमुदत उपोषण आंदोलन करून सरकारला त्यांनी इंशारा दिला होता तेव्हा सरकारने सकारात्मक प्रतिसाद दिल्याने त्यांनी संघटनेच्या पदाधिकारी यांच्याशी चर्चा करून आंदोलन स्थगित केले होते. त्यानंतर मंगल भुजबल यांनी आरोग्याचे आयुक्त व आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांना सातत्याने भेटून कंत्राटी कर्मचारी यांना शासकीय कायम सेवेत करण्याच्या फाईलचा पाठपुरावा त्या करत होत्या.

मेंडका नदीला आलेल्या पुरामुळे बाबुर्डी घुमट परिसरातील लोकवस्तीचा गावाशी संपर्क तुटला असून पुरातून मार्गक्रमण करत असलेले दूध व्यावसायिक पहिल्या छायाचित्रात तर या नदीवर पुलाचे काम करावे अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

पुराच्या पाण्यामुळे वाडी-वस्तीचा बाबुर्डी घुमट गावाशी संपर्क तुटला

मेंढका नदीवरील पुलाचे काम होण्यासाठी लढा उभारणार; ग्रामस्थांचा निर्धार

नगर - जोरदार पावसामुळे बाबुर्डी घुमट (ता. नगर) कार्यक्षेत्र व वाळुंज हद्दीतील मेंढका नदीला आलेल्या पूराने नदीच्या पलीकडील वाडी-वस्तींचा गावापासून संपर्क तुटला आहे. पूराचे पाणी कमी होत नसल्याने व पर्यायी स्त्ता नसल्याने जीव धोक्यात घालून ग्रामस्थ पुराच्या पाण्यातून मार्गक्रमण करत आहे. मागील तीन दशकापासून ग्रामस्थ या नदीवर पुल बांधण्याची मागणी करत असून, लोकप्रतिनिधी व प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप स्थानिक ग्रामस्थांनी केला आहे. पुलाचे काम करा, अन्यथा विधानसभेला मते मागण्यासाठी येऊ नका! असा पवित्रा ग्रामस्थांनी घेतला आहे.

शहरापासून अवघ्या १२ किलोमीटर अंतरावर असलेल्या बाबुर्डी घुमट कार्यक्षेत्र व वाळुंज हद्दीत हा परिसर असल्याने या परिसराची हद्द श्रीगोंदा आहे. तर मतदार संघ पारनेर असल्याने दोन्ही कडील लोकप्रतिनिधी या ग्रामस्थांच्या प्रश्नाकडे लक्ष देत नसल्याची संतप्त भावना ग्रामस्थांची आहे. नुकत्याच झालेल्या जोरदार पावसाने वाळुंज हद्दीतील मेंढका नदी लगत असलेल्या चव्हाण मळा, कुंजीर मळा, दरेकर मळा तसेच हिंगे मळा येथील लोकांचे जनजीवन विस्कळीत झालेले असून, त्यांचा गावाशी संपर्क तुटला आहे. सदर नदीवर पूल होण्यासाठी स्थानिक नागरिकांच्या माध्यमातून लढा उभारणार असल्याचे बाळासाहेब कुंजीर, देवा कुंजीर, पवन कुंजीर, गोपाल कुंजीर, जितेंद्र दरेकर व माजी उपसरपंच तानाजी परभाणे यांनी म्हंटले आहे.

दरवर्षी पावसाळ्यात या भागात अशीच परिस्थिती निर्माण होत असून, कामगार वर्गाला मोलमजूरी पासून वंचित रहावे लागत असून, दुध व शेती व्यवसाय कोलमडून पडतो. तर मुलांना देखील शाळेत जाता येत नाही. आरोग्याचा प्रश्न गंभीर झाल्यास जीव धोक्यात घालून पूराच्या पाण्यातून वाट काढावी लागत असल्याची माहिती तानाजी परभाणे यांनी दिली.

अशोकभाऊ फिरोदियाने पटकाविला उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धेचा सांघिक करंडक

१७ शाळांचा सहभाग; सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंटची शांभवी शर्मा प्रथम

नगर - अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनियर कॉलेजमध्ये उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धा उत्साहात पार पडली. संस्थेचे संस्थापक स्व. अशोकभाऊ फिरोदिया यांच्या स्मरणार्थ घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेला शालेय विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला. या वर्षी अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूलने स्पर्धेचा सांघिक फिरता करंडक पटकाविला.



शालेय विद्यार्थ्यांसाठीच्या वक्तृत्व स्पर्धेत सांघिक करंडक पटकावणाऱ्या अशोकभाऊ फिरोदिया संचाचा पारितोषिक वितरण करताना निवृत्त कृषी अधिकारी शिरीष जाधव व अध्यापिका मार्गदर्शिका स्वामी. समोर पारितोषिक प्राप्त संघ.

दरवर्षी घेतली जाणारी उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धा शालेय विद्यार्थ्यांसाठी प्रमुख आकर्षण ठरत आहे. स्पर्धकांना ऐन वेळेस विषय देऊन त्यावर विचार मांडण्यास सांगण्यात आले होते. अशोकभाऊ फिरोदिया शाळेच्या समागृहात प्रारंभी प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा परिक्षक सेवानिवृत्त कृषी अधिकारी शिरीष जाधव व प्रमुख पाहुणे अहमदनगर ज्युनिअर कॉलेजच्या अध्यापिका मार्शनिल स्वामी उपस्थित होत्या. याप्रसंगी शाळेचे प्राचार्य प्रभाकर भाबड, उपप्राचार्या कविता सुरतवाला, माध्यमिक विभाग प्रमुख वैशाली वाघ, प्राथमिक विभाग प्रमुख रेखा शर्मा, पूर्व प्राथमिक विभाग प्रमुख कांचन कुमार उपस्थित होत्या. शाळेच्या विद्यार्थिनींनी समूहगीताने पाहुण्यांचे स्वागत केले. त्यांना शाळेच्या शिक्षिका सुवर्णा मलमकर यांचे मार्गदर्शन लाभले.

शिरीष जाधव म्हणाले की, विद्यार्थ्यांनी स्पर्धेला न घाबरता सामोरे जावे. अडचणीपेक्षा स्वप्ने मोठी असतात, तेव्हा विद्यार्थ्यांनी स्वप्ने पहावीत व त्याप्रमाणे वाटचाल करून कष्टाने तो पूर्ण करण्याचे आवाहन केले.

मार्शनिल स्वामी म्हणाल्या की, स्पर्धेचे जग आहे. विद्यार्थ्यांनी आवड असलेल्या स्पर्धेत उतरले पाहिजे. स्पर्धेत उतरलेल्या क्षेत्राची परिपूर्ण माहिती घेऊन नियम पाळण्याचे सांगून, दरवर्षी विद्यार्थ्यांच्या विचाराला चालना देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या या स्पर्धेचे त्यांनी कौतुक केले.

परिचय रुबीना शेख व आसिफ शेख यांनी करून दिला. स्पर्धेचे नियम आणि अटी विद्या यादव यांनी स्पर्धकांना समजवून सांगितले. वक्तृत्व स्पर्धेचे सूत्रसंचालन मनिष कांबळे व कल्पना लोंढे यांनी केले. सकाळच्या सत्रात वक्तृत्व स्पर्धा रंगली होती. विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर मनमोकळे आपल्या भावना मांडल्या.

स्पर्धा संपल्यावर निकाल जाहीर करून बक्षिस वितरण करण्यात आले. या स्पर्धेत १७ शाळांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये प्रथम- शांभवी अभिजीत शर्मा (सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट), द्वितीय- लेविया प्रशांत सोनकांबळे (ऑक्सिलियम कॉन्व्हेंट), तृतीय- सहीला दीपक कोकणे (अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूल), उत्तेजनार्थ- कोमल शिवाम बैरवा (पंडित नेहरू हिंदी विद्यालय), प्रज्ञा संजय भक्कड (अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूल) यांनी बक्षिसे पटकावली. उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते विजेत्या स्पर्धकांना बक्षिसे देण्यात आली.

प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, उपाध्यक्ष अशोक मुथा, सह कार्यवाह गौरव फिरोदिया, खजिनदार प्रकाश गांधी यांनी विजेत्या स्पर्धकांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. पारितोषिक वितरण समारंभाची सूत्रे मनिष कांबळे यांनी सांभाळून निकाल जाहीर केला. आभार संगीता वंगा व अफसर शेख यांनी मानले. स्पर्धा यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

जागा विकणे
नालेगाव येथील एम.एस.ई.बी. ऑफिसच्या पुढील रोड टच २ गुंठे जागा त्वरित विकणे आहे.
8888675007

1 BHK फ्लॅट भाड्याने देणे
एकविरा चौक ते जुना पिंपळगाव रोड, लेखानगर जवळ, 1 BHK फ्लॅट (६०० स्क्वे.फु.) सर्व सुखसोयीयुक्त
8329368599

धनश्री उद्योग
सरकारमान्य संस्था
घरातून काम करा व रोज कमवा
500 ते 1000 रु.
बारापी महीने विविध पॅकिंगचे व्यवसाय करा.
माल फ्री घरपोहोच
अंबर प्लाझा डेपारमेंट, नगी मेडिकलच्या खाली, माळीवाडा एस.टी. स्टॅण्ड समोर, अ.नगर
7066575497

नामांकित टाईल्सच्या शोरूममध्ये अकौंटंट पाहिजे
टॅलीचे ४ ते ५ वर्षांचा काम केल्याचा अनुभव आवश्यक
लेडिज/जेन्टस्
Excel व Tally चे ज्ञान असणा-यांनीच संपर्क साधावा (अनुभवीच आवश्यक पगार)
डी-मार्ट जवळ, नगर-मनमाड रोड, साळवी
9590151515

CCTV टेक्निशियन पाहिजे
कामाचे ठिकाण :- अहमदनगर City
स्वतःची बाईक असणे आवश्यक आहे.
9860805244

पाहिजेत
* सेल्समन-२ (ऑर्डर बुकिंग करिता)
* अकौंटंट-२ (१ महिला, १ पुरुष)
अनुभवी (टॅली प्राईम व जीएसटी चे ज्ञान असणे आवश्यक)
-: रा.ग मार्केटिंग :-
9028888171
9021100171

पाहिजेत
सेल्समन : २ | सेल्सगर्ल : २
हेल्पर : २
अनुभवीस प्राधान्य
अजरीराह समक्ष भेटा
पेठमाणी चेंबर मार्ग. ७.०० ते ९.००
स्वतंत्र मार्गी
अची फॅशन
कराशेठजीरोड, मालवद खुट, अ.नगर

पाहिजेत
कॉम्प्युटर ऑपरेटर (महिला) जागा - १
मार्केटयार्ड अ.नगर
8010587454

पाहिजेत
शेअर मार्केट ऑफिस करिता
ऑफिस बॉय- ०१
(अनुभवाची आवश्यकता नाही)
9511623066
8485886298

किड्स वेअर शोरूमसाठी पाहिजेत
सेल्समन : २ | सेल्सगर्ल : २
हेल्पर : २
अनुभवीस प्राधान्य
अजरीराह समक्ष भेटा
पेठमाणी चेंबर मार्ग. ७.०० ते ९.००
स्वतंत्र मार्गी
अची फॅशन
कराशेठजीरोड, मालवद खुट, अ.नगर

इंग्रजी टायपिस्ट पाहिजे
पूर्णवेळ/अर्धवेळ (मुली/महिला)
पोलारीस डायग्नोस्टिक्स
दादा चौधरी शाळेच्या जवळ अहमदनगर
9769896293

इमारत विकणे आहे
दवा बाजार, बॉम्बे बेकरी जवळ, चर्च रोड, अहमदनगर येथील रोडटच तीन मजली इमारत (जागा) विकणे आहे
संपर्क- 8999012161

शेअरिंग कॅब डेली सर्व्हीस
नगर-पुणे-नगर
आता आपल्या शहरातून

इनोव्हा
- नगर वेळून स.७,८,९ व दुपारी २.००
- पुणे वेळून क.१२,१६,२ व सायं.५ वा
Ac Xccent / WegonR / Dzire
प्रत्येक वेळेस निरजंतुकीकरण
मर्यादित ३ सिट्स
पिकअप पॉईंट - चिपळूण चौक, झोपडी कॅन्टीन, तारकपूर डिझेल, राज पेंसेल चौक, शास्त्रीनिक चौक, केडगाव
पुणे ठ्रॉव- सयोगी, सरसी, सायपास, वेगळा, नवीन जिल्हाधिकार कार्यालय. विकण आवश्यक
उमेद-ट्रॅव्ह लॉजिस्टिक्स
ऑफिस- चितळेरोड, अ.नगर
9657746555/ 9226399555

मावशी पाहिजे
दवाखान्यात साफ सफाईसाठी
- संपर्क -
9823787910

पाहिजेत
नगर शहरातील होलसेल एजन्सीत कॉम्प्युटर बिलींगसाठी लेडीज पाहिजेत. (सकाळी १० ते रात्री ७)
9028141515

पाहिजेत
लिनन हाऊस, शिरूर,या कपडयाच्या दुकानासाठी
अनुभवी सेल्समन
पाहिजेत
आकर्षक पगार, राहण्याची व्यवस्था
9552521135

REQUIRED
Vacancies in reputed cement company located at ahmednagar for All department.
1) Account (Female) - 1 (B.com, M.com, Tally)
2) Telecaller (Female) - 1 (Any Graduate)
Address : Durvankur Building, Bagadpatti Road, Saibaba Mandir, Ahmednagar-414001, 8623963979

डॉ.योगेश सिसोदिया (M.S.ORTHO)
गुडघेदुखी, सांध्याचे आजार, लिगामेंट व स्पोर्टस् इंज्युरी तज्ञ.
संलग्न हॉस्पिटल
संचेती हॉस्पिटल (पुणे) | साईदीप हॉस्पिटल (नगर) : दर शनिवारी
अहमदनगर व्हिजीट : साईदीप हॉस्पिटल
दर शनिवारी : वेळ सकाळी १० ते १२ (अपॉईटमेंट साठी संपर्क)
9860267116 / 7387393683

वाढलेल्या वजनाने त्रस्त आहात? वजन कमी करणे झाले सहज शक्य

7020025541

आता वजन कमी करणे किंवा वाढवणे झाले सोपे
तुमच्या घरातून दररोज व्यायाम करा.
यासाठी मोफत मार्गदर्शन.
अंबादास इंगळे
Ex Army Fitness Expert
मो. 8888352220
8888362220

कुत्रा हरवला आहे

शनिवार दि.- २१/०९/२०२४ रोजी पाऊणे पाच वाजता बालिकाश्रम रस्त्यावरुन शेस नावाचा लॅब्रेडॉल, तपकिरी रंगाचा कुत्रा वय वर्षे-अडीच, हरवला आहे. सापडुन देणाऱ्यास योग्य ते बक्षिस दिले जाईल
संपर्क - डॉ. मनिषा घुंड
9822316642

बॅक ऑफिस कामासाठी अनुभवी मुलगी पाहिजे
Tally | MS-CIT
Excel | Word
कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक
संपर्क- फ्र.
9168198989

शोक मिलन

आठवण तुमची प्रत्येक क्षणाला, व्याकुळ करते आमच्या मनाला.. आज जरी नाही तुम्ही आमच्यात, सदैव राहतील तुमच्या आठवणी आमच्या मनात..
स्व.ॲड.प्रकाश भवरलालजी मेहता
(बापूसाहेब) (धुळे)
स्व.दि.२५/०९/२०२४
- शोक मिलन -
शुक्रवार, दि.२७/९/२०२४ रोजी
सायं.४ ते ६ या वेळेत होणार आहे.
स्थळ : वर्धमान बंगला, सस्था कॉलनी,अ.नगर
- शोकाकुल -
केशर गुलाब नेवासकर
मुनोत परिवार

The Club Resort
* Lawns * Ac banquet * luxuries Room
* unique restorant * and many more ...
Address : Behind D.Mart, Hotel Nagri village, Ahilyanagar
9270570699

CHANG IN NAME
My Old Name Was
Azim Ashapaq Sayyad
(On Aadhar Card)
But Now It Will Be
AZIM ASHAFAQ SAYYAD
940072437041

पाहिजेत
नामांकित डायग्नोस्टिक सेंटरसाठी
रिसेप्शनिस्ट | टायपिस्ट
त्वरित पाहिजेत.
(डायग्नोस्टिक सेंटरमध्ये कामाचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य.)
संपर्क :
फोन : 0241-2411010
9653969090
9653969292

CONNPLEX
दिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात. दिनांक : 20 सप्टें. ते 27 सप्टें. 2024

नवरी माझा नवसाचा: AM 09:00 | 11:45, PM 02:30 | 04:45, 07:30 | 10:15
युद्धा (हिंदी): AM 09:45 | 11:30, PM 04:30 | 10:45
तुंबड (हिंदी): AM 11:25, PM 05:15 | 10:30
स्त्री-२ (हिंदी): AM 08:30, PM 01:45 | 07:40
द ग्रेटेस्ट ऑफ ऑल टाईम (हिंदी): PM 07:15
कहां शुरू कहां खतम (हिंदी): PM 02:15
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
Available on bookmyshow
3" Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
6353564618 / 7790094001